
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय बा. वाङ्मय
दा. क्र. ११८७१८

IRBK-0111718

IRBK-0111718



# एका शास्त्रज्ञाचें स्वप्न

□□□

कुमुदिनी खांडेकर



IRBK-0111718

९

किशोर कादंबरिका

श्री : ५७७ : [ ४-६७ ]

©१९६७
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ति पहिली
शके १८८९, सन १९६७

मूल्य रु. २-००


प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, मुंबई २

कंपोज :
बाबर व भंडारी कं.
३४२ नारायण पेठ
पुणें २


मुद्रक :
एस. जी. घोरपडे
प्रिंटेक्स्ट,
४६४।१ सदाशिव, पुणें २.

किशोर कादंबरिका





विज्ञानयुगांत आपण वावरतों आहोंत, असें म्हटलें जातें. विज्ञानाचा उपयोग माणसाच्या कल्याणासाठीं, सुखासाठीं व्हावा, अशी अपेक्षा असते. परंतु एका विज्ञानशास्त्रीय संशोधकाच्या डोक्यांत एक दुष्ट कल्पना आली. स्वत:च्या स्वार्थासाठीं त्यानें माणसांना दुष्ट बनविणारें एक रसायन तयार करण्याचें ठरविलें. तथापि दुसऱ्या एका शास्त्रज्ञानें माणसाचा मूळ दुष्ट स्वभाव पालटवून त्याला सज्जन बनविण्याचा चंग बांधला; आणि त्या उद्योगांत त्यानें अपूर्व यश मिळविलें. अशी ही एक विज्ञान-काल्पनिका (ज्याला इंग्रजींत 'सायन्स फिक्शन' म्हणतात) आहे. आणि त्याच्याशीं संबंध आला आहे तुमच्यासारख्याच एका छोटया मुलाचा. कसा तें मात्र या कादंबरिकेंतच वाचायला हवें.




१. दादा नाहींसे झाले

२. परागची भेट

३. अंकुर नर्सरींत

४. विलक्षण सुटका

५. हे कोण आजोबा ?

६. पुतळ्याचें रहस्य

७. आव्हान स्वीकारलें

८. प्रयोग यशस्वी झाला

# १

## दादा नाहींसे झाले

"हें बघ चंद्रशेखर, तूं हा जो नवा शोध लावलास ना, त्याबद्दल आम्हीमन:पूर्वक अभिनंदन करतों तुझं," राजगुरु मास्तर म्हणाले, "पण विज्ञानाच्या मदतीनं या जगांतली प्रत्येक गोष्ट बदलणं मात्र शक्य नाहीं तुम्हां शास्त्रज्ञ लोकांना, हेंहि लक्षांत ठेव."

"अहो, निसर्गांतलीं पुष्कळशीं गूढं जरी शास्त्रज्ञांनीं उकललीं तरी कांहीं कांहीं गोष्टी तशाच बाकी राहणार. त्या तशा कां, याचं उत्तर–देवाची करणी हेंच!" हरिभक्त-परायण सुखात्मे म्हणाले.

"आतां हीच गोष्ट घ्या ना," तावातावानें राजगुरु मास्तर म्हणाले, "ही बदलणं या चंद्रशेखरला अजिबात जमणार नाहीं."

"अहो पण कुठली?" डॉक्टर चंद्रशेखरांनीं हंसत विचारलें.

"माणसाचा स्वभाव!" राजगुरु मास्तर म्हणाले, "बदलणं शक्य आहे तुम्हां शास्त्रज्ञ लोकांना?"

"कोण म्हणतो स्वभाव बदलतां येणार नाहीं म्हणून?" डॉक्टर चंद्रशेखरांनीं विचारलें.

“अरे, दुसरं कुणी कशाला म्हणायला हवं,” सुखात्मे अन् राजगुरु म्हणाले, “आम्ही म्हणतों कीं माणसाचा स्वभाव बदलणं सर्वथैव अशक्य आहे.”

“कुणीसं म्हटलंय् ना,” नाटककार चतुर म्हणाले, “आधीं होती दासी। पट्टराणी केलें तिसी। तिचें हिंडणें राहींना। मूळ स्वभाव जाईना॥ तें अगदीं खरं आहे.”

“मग मीहि निश्चयपूर्वक सांगतों,” डॉक्टर चंद्रशेखर बोलले, “शास्त्रीय प्रयोगाच्या मदतीनं माणसाचा स्वभाव बदलणं ही गोष्ट अगदीं सहजसुलभ आहे, असं माझं मत आहे. अर्थात् त्यासाठीं बरंच संशोधन मात्र करावं लागेल. सध्यां माझे प्रयोग चालू आहेत अन् लवकरच मी त्यांत यश मिळवीन अशी खात्री वाटते मला.”

“हं ऽ, खरं नाहीं वाटत बुवा,” डॉक्टर सदानंद म्हणाले, “अहो, शारीरिक विकृति घालवणं वेगळं अन् स्वभाव बदलणं वेगळं.”


“आत्तांपर्यंत मीं जे शोध लावले त्या प्रत्येक वेळीं तुम्ही आधीं असंच म्हटलं होतंत,” डॉक्टर चंद्रशेखर म्हणाले.

“हें मात्र खरं हां!” इतका वेळ गप्प बसलेले डॉक्टर विश्वास म्हणाले, “कल्पनेंतसुद्धां शक्य वाटणार नाहीं असे शोध आत्तांपर्यंत लावलेस खरे तूं.”

“डॉक्टरसाहेब, आपल्यालाच ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखवितां येईल,” कोपऱ्यांतला तरुण शास्त्रज्ञ आदरानें बोलला.

“हं,” सुखात्मे म्हणाले, “चंद्रशेखरला या बाबतींत यश मिळालं तर मात्र मोठंच आश्चर्य घडेल म्हणायचं.”

"तेंच करून दाखवणार आहें मी," चंद्रशेखर रुबाबानें म्हणाले, "मी अगदीं खात्रीनं सांगतों, यंदाच्या विज्ञान परिषदेपर्यंत मी माझं या बाबतींतलं संशोधन पूर्ण करीन. एवढंच काय, पण या संशोधनाची संपूर्ण कल्पना देणारं प्रात्यक्षिकहि परिषदेपुढं ठेवूं शकेन मी."



"पण या संशोधनाचा व्यवहारांत उपयोग काय?" चतुरनीं विचारलें.

"न व्हायला काय झालं?" चंद्रशेखरनीं सांगितलें, "असं केलं तर? प्रत्येक माणसाच्या स्वभावाची परीक्षा करायची. त्यांतले दोष काढून टाकायचे. ठराविक उपचार करून ते काढून टाकायचे अन् दुसरे कांहीं उपाय करून त्याच्यांत गुण निर्माण करायचे. अहो, असं जर केलं तर जगांतल्या खूप वाईट गोष्टी नाहींशा होतील."

"खरंच, मग कुणी कुणावर रागावणार नाहीं," हरि भक्तपरायण सुखात्मे म्हणाले.

"मारामाऱ्या थांबतील." नाटककार चतुर उद्गारले.

"भित्र्याला धीट बनवतां येईल," राजगुरूंनीं म्हटलें.

डॉक्टर विश्वासना राहवेना. "दुःख औषधालाहि उरा यचं नाहीं," ते बोलले.

"मारामाऱ्या, खून, गुन्हे, युद्धं सगळं संपणार," तो पोरगेलासा तरुण शास्त्रज्ञ नम्रपणें म्हणाला, "अन् तें डॉक्टरसाहेबांच्या संशोधनामुळं."

"हो. अन् जगांत आनंदीआनंद होणार," चंद्रशेखर म्हणाले.

"डॉक्टरसाहेब, तुमचं हें संशोधन जगापुढं येऊं द्या," एकानें सूचना केली.

दुसऱ्यानें मत प्रकट केलें, "विद्वानांत अगदीं खळबळ माजेल तुमच्या या संशोधनानं."

"भारताच्या कीर्तीत भर पडेल," तिसऱ्यानें गौरवून म्हटलें.

"अन् त्याहिपेक्षां हर्षाची गोष्ट म्हणजे," तो पोरगेलासा तरुण शास्त्रज्ञ म्हणाला, "एवढा मोठा आश्चर्यकारक शोध लावणारे डॉक्टर चंद्रशेखर बुद्धिसागर माझ्या परिचयाचे आहेत, असं रुबाबांत सांगतां येईल आम्हांला !"

त्या सर्वांचें बोलणें ऐकून डॉक्टर चंद्रशेखर खूप हंसले अन् म्हणाले, "आत्तांपर्यंत संशोधनांत मीं जें यश मिळवलं तें तुमच्या सर्वांच्या सदिच्छा माझ्या पाठीशीं होत्या म्हणूनच.

याहि वेळीं तुमच्या सदिच्छा हव्याहेत मला. मग मी यशाची पायरी अवश्य गाठीन."

त्या दिवशींच्या चर्चेमधला हा भाग अतुलला पुन्हां पुन्हां आठवायचा अन् त्याला वाटायचें, 'खरंच कुठं असतील आपले दादा?' आतांहि तो शाळेकडे निघाला होता तो हेच विचार मनांत घोळवीत.

"नमस्ते अतुलराव, ओळखलं ना मला?" समोरून येणाऱ्या माणसानें अतुलला एकदम अडवून विचारलें.

खांद्यावरचें पुस्तकांचें पाकीट सावरीत अतुलनें मनाशीं विचार केला, 'कोण बरं हा माणूस?' पण पुन्हांपुन्हां आठवण्याचा प्रयत्न करूनहि समोरच्या माणसाला कुठें पाहिल्याचें त्याला आठवेना. अंहं ऽ, "नाहीं आठवत तुम्हांला कुठं पाहिलं तें", अतुलनें त्या माणसाला कबुली दिली.

"काय म्हणायचं बुवा! एवढी ओळख विसलांत?" त्या माणसानें उद्गार काढले.

अतुलनें म्हटलें, "अहो ओळखच नाहीं, तर विसरण्याचा प्रश्नच आला कुठं?"

"तुम्हीं जरी ओळखलं नसलं मला तरी मी ओळखतों बरं का तुम्हांला," समोरच्या माणसानें हंसून म्हटलें.

"पण"—अतुलनें निश्चयपूर्वक सांगितलें, "पण मी नाहीं ना ओळखत तुम्हांला. जाऊं द्या मला. शाळेला जायला उशीर होईल नाहींतर."

"अतुलराव थांबा. तुम्ही सुप्रसिद्ध मानसतज्ज्ञ चंद्रशेखर बुद्धिसागरांचे चिरंजीव ना?" त्या माणसानें आपलें घोडें

पुढें दामटलें, "अहो, तुमच्या वडलांची अन् माझी बरीच जुनी मैत्री आहे म्हटलं. माझं नांव पराग."



"काय हो, मग मीं तुम्हांला आमच्या घरीं कधीं आलेलं कसं बघितलं नाहीं? दादांचे सगळे मित्र माहीत आहेत मला," अतुल म्हणाला, "काय? आतां का बोलत नाहीं?"

एकदम सलगी करीत व एकेरी नांवानें बोलत तो माणूस म्हणाला, "हं ऽ हें मात्र खरं आहे तुझं म्हणणं. अरे, पण तुझ्या घरीं कधीं आलों नाहीं म्हणजे दादांची अन् माझी ओळखच नाहीं, असं नाहीं म्हणतां यायचं तुला."

अखेर त्या अनोळखी माणसानें अतुलचा हात धरीत म्हटलें, "खरं म्हणशील तर तुला आवडेल अशी एक बातमी सांगेन म्हणत होतों. पण–पण तूं थांबायलाच तयार नाहींस; तेव्हां जाऊं दे."

त्याचें बोलणें ऐकून अतुलचें कुतूहल जागें झालें. त्यानें विचारलें, " आवडेल अशी बातमी सांगणार म्हणतां ? "

" हो तर; तुला भेटलों तो तेवढ्यासाठींच, " परागनें म्हटलें.

" काय सांगणार आहांत ? "

" सांगतों, सांगतों, पण इथं या गर्दींत नको. "

" इथं नको ? " अतुलनें विचारलें, " मग कुठं ? "

" एखाद्या निवांत जागीं बसून बोलूं आपण. चालेल ?"

" पण काय हो, " घाईनें अतुल म्हणाला, " एवढी बातमी तरी कसली सांगणार आहांत, तें तर सांगा. "

त्याच्या कानाजवळ तोंड नेऊन परागनें म्हटलें, " तुझ्या दादांच्या बद्दलची. "

ते शब्द ऐकल्याबरोबर मात्र कांहीं न बोलतां अतुल त्याच्याबरोबर चालायला लागला.

जरा वेळानें ' गोकुळ ' अशी पाटी असलेल्या एका दुग्धालयांत ते दोघे शिरले. कोपऱ्यांतल्या छोट्या जिन्यानें परागबरोबर अतुल वरच्या मजल्याकडे निघाला. कोपऱ्यांतल्या मेजाजवळ जातां जातां अतुल अधीरपणें म्हणाला, " हं, सांगा आतां. "

" अरे बाबा, हळू. भिंतीला कान असतात म्हटलं, " खालच्या आवाजांत परागनें त्याला दाबलें.

आलेल्या सेवकानें तबकामधून त्याच्यापुढें खाद्यपेयांची यादी आणून ठेवली. त्या यादीकडे नजर टाकीत परागनें विचारलें, " मसल्याचं दूध घेशील ना तूं ? "

अतुलनें होकारदर्शक मान हलवली.

" अच्छा, दो गरम दूध लाव, " परागनें सेवकाला फर्मावलें.

" और क्या लाऊँ ?" सेवकानें विचारलें.

" कुछ नहीं, " परागनेंच उत्तर दिलें.

सेवकाची पाठ फिरलेली बघून गरमगरम दुधाचा घुटका घेत अतुलनें म्हटलें, " हं, सांगा बघूं आतां. "

परागनें शांतपणानें खिशांतून एक चिठी काढून त्याच्या हातांत ठेवली अन् म्हटलें, " वाच. पण मनांत बरं का. "

हिरव्या रंगानें टाईप केलेली ती चिठी अतुलनें वाचायला सुरुवात केली :

" प्रिय अतुल,

तुझ्या प्रिय दादांची तुला सारखी आठवण होत असेल, नाहीं ? मलाहि तुझे दादा फार आवडतात. त्यांनीं घरीं परत यावं, असं वाटतं ना तुला ? मग मला भेट. मीं आखलेल्या योजनेला तूं मदत केलीस तरच त्यांना संकटांतून सोडवण्याच्या कामांत नक्की यश मिळेल आपल्याला.

चिठी घेऊन येणारा माझा जिवलग मित्र आहे अन् मी दादांचा मित्र. आतां तूं माझा मित्र बनायला हवंस. त्यासाठीं आवश्यक आहे ती आपली भेट. त्यासाठीं अधीर झालेला,

तुझाच

अंकुर."

अतुलनें दोनतीनदां मनांतल्या मनांत चिठी वाचली. त्या वेळीं पराग त्याच्या तोंडाकडे टक लावून बघत होता. मनांतल्या मनांत तो खूष झाला होता.

अतुलनें चिठीची घडी करून त्याच्या हातांत परत दिली तेव्हां परागनें म्हटलें, " काय, आहे कीं नाहीं महत्त्वाची बातमी ? "

" फारच महत्त्वाची, " अतुलनें म्हटले.

" मग ? " परागनें विचारलें, " काय ठरला विचार ?"

खुर्चीवरून उठत अतुल त्याला म्हणाला, " आजच जाऊं आपण. "

" अरे, पण तुझी शाळा ? " डोळे मिचकावीत पराग म्हणाला, " हें बघ, उद्यां इथंच भेटेन मी तुला, चालेल?"

" हो चालेल ", अतुलनें मान डोलावली.

अतुलच्या खांद्यावर हात ठेवीत परागनें म्हटलें, " हो, पण एक लक्षांत ठेव बुवा. ही बातमी तुझ्याशिवाय आणखी कुण्णाला कळतां कामा नये. आहे कबूल ?"

" अगदीं आईलासुद्धां सांगायची नाहीं म्हणतां ? " अतुलनें विचारलें. क्षणभरानें मान हलवीत त्यानें म्हटलें, " मग नाहीं जमायचं. "

" आईला सांगायला वास्तविक हरकत नाहीं. पण असं करायचं का, आपण तुझ्या दादांनाच एकदम तिच्यापुढं नेऊन उभं करूं. असं करणंच जास्त योग्य आहे. "

" वा ! छान कल्पना आहे, " परागच्या हातावर टाळी देत अतुल म्हणाला.

" अच्छा, आतां निघूं आपण ", असें म्हणत पराग उठला तसा अतुलहि पण उठला.

दुग्धालयांतून बाहेर पडल्याबरोबर " येतों " म्हणून परागनें अतुलचा निरोप घेतला तसा अतुलनें शाळेचा रस्ता धरला. घड्याळाकडे बघत झपझप चालत तो शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ आला. शाळेची घंटा वाजत होती. घाईघाईनें तो वर्गांत शिरला. प्रार्थना सुरू झाली होती.

प्रार्थना संपल्यावर वर्गशिक्षकांनीं नोंदवही ( रजिस्टर ) उघडून हजेरी घ्यायला सुरुवात केली. पण आज अतुलचें लक्षच नव्हतें मुळीं तिकडे. " बुद्धिसागर अतुल, " असें दोनदां शिक्षक म्हणाले तेव्हां कुठें तो " प्रेझेंट सर ! " म्हणाला. हजेरी संपवून शिक्षकांनीं इंग्लिशचें पुस्तक उघडलें अन् कवितेचें पाठान्तर घ्यायला सुरुवात केली. अतुलला त्यांनीं कविता म्हणायला सांगितल्यावर त्यानें जी सुरुवात केली ती सबंध कविता म्हणूनच तो खालीं बसला. अन् त्याच क्षणीं सबंध वर्गाचा हंसण्याचा आवाज त्याच्या कानांवर आला. " अरे, एक कडवं झाल्याबरोबरच सर पुरे म्हणत होते पण तुझं लक्ष होतं कुठं ! " त्याच्या शेजारच्या प्रदीपनें सांगितलें. पण त्यावर कांहीं न बोलता तो नुसताच हंसला. तेवढ्यांत पहिला तास संपलासुद्धां.

दुसरा तास गणिताचा होता. आज पेंडसेबाईनीं गणिताच्या उत्तरपत्रिका तपासून आणल्या होत्या. त्याचा गठ्ठा सोडतां सोडतां घाईघाईनें त्या म्हणाल्या, " नेहमींप्रमाणं अतुल बुद्धिसागरनं पहिला क्रमांक पटकावला आहे. त्याचं मी अभिनंदन करतें. " वर्गांतल्या मुलांनीं टाळ्या वाजवल्या. त्याच वेळीं अतुलनें उठून मान लवविली अन् त्या अभिनंदनाचा स्वीकार केला. पण पहिला क्रमांक पटकावल्याबद्दल

नेहमीं त्याला जसा आनंद व्हायचा तसा आनंद आज झाला नाहीं. मनांतल्या मनांत तो अंकुरच्या पत्राचें पारायण करीत होता. आजचा दिवस कधीं संपतो असें झालें होतें त्याला.

क्षणभरांत तो विचारांच्या तंद्रींतून जागा झाला. वर्गांतल्या ध्वनिवर्धकाच्या पेटींतून मुख्याध्यापकांचें बोलणें ऐकूं यायला लागलें. ते म्हणत होते, " मुलांनो, काल राज्य-क्रीडा स्पर्धेचा हुतुतूचा अंतिम सामना झाला. या सामन्यांतहि आपल्या शाळेच्या संघानें विजय मिळवला आहे. सांघिक खेळांत शाळेला तीन ढाली मिळाल्या. वैयक्तिक स्पर्धेतलीं वीस पारितोषिकें आपल्या शाळेच्या खेळाडूंनीं मिळवलीं आहेत, ही आणखी एक विशेष गोष्ट. या स्पर्धेत ज्यांनीं भाग घेतला अन् विजय मिळवून शाळेच्या कीर्तींत भर घातली त्यांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों." सर्व वर्गांतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट ऐकूं आला. किंचित् थांबून मुख्याध्यापक म्हणाले, " आपल्या शाळेला हा जो विजय मिळाला त्याबद्दलचा आनंद व्यक्त करण्यासाठीं तुम्हांला आज सुटी देण्यांत येत आहे. घंटा झाल्यावर विद्यार्थ्यांनीं घरीं जावें."

मुख्याध्यापकांचें बोलणें ऐकून अतुलला हायसें वाटलें. आतां अंकुरच्या पत्राबद्दल विचार करायला त्याला हवा तेवढा वेळ मिळणार होता. शाळा सुटल्यावर तो एकटाच बाहेर पडला अन् घराच्या दिशेनें चालूं लागला. ज्या ठिकाणीं पराग त्याला सकाळीं भेटला होता तिथें आल्यावर तो किंचित् थबकला, कदाचित् पराग आत्तांहि पुन्हां आपल्याला भेटेल या कल्पनेनें.

त्याच्या मनांत आलें, ‘ सकाळीं परागशीं बोलायला तयार नव्हतों आपण अन् आत्तां, मात्र तो भेटावासा वाटतोय् ! बाकी ज्याची भेट एवढी हवीहवीशी वाटत्येय् तो पराग म्हणजे लबाड माणूस तर नसेल ना ? नाहींतर असायचा एखादा गुंड, मवाली ! पण छे, त्याचा पोशाख, त्याचं वागणं, बोलणं सगळं कसं सभ्य माणसासारखं वाटत होतं. पण एक मात्र अजूनहि कळत नाहीं—त्याला आपण दादांच्याकडे कधींच आलेलं कसं पाहिलं नाहीं ? अन् त्या अंकुरच्या पत्राबद्दल कुणाजवळहि बोलूं नकोस, असं तरी त्यानं कां बरं सांगितलं ? हो, अन् म्हणे आईलासुद्धां सांगायचं नाहीं ! एकप्रकारें बाकी बरोबर आहे त्याचं म्हणणं. हो, आईला आज त्या पत्राबद्दल सांगायचं अन् समजा, अंकुरची योजना कोसळली तर ?– तर आणखी तिचं दुःख वाढायचं. एक नवीन काळजी सुरू व्हायची. त्यापेक्षां अंकुरला आपण मदत करावी अन् दादांना संकटांतून सोडवून घरीं आणावं. तोंपर्यंत कांहीं पत्ता लागूं द्यायचा नाहीं. हं, नक्की ठरलं. ’

अतुल घरीं आला. आई रोजच्याप्रमाणें महाविद्यालयांत गेली होती. हातपाय धुऊन झाल्यावर त्यानें थंड पाण्यानें तोंड धुतलें तेव्हां त्याला बरें वाटलें. बैठकीच्या खोलींत आल्यावर त्यानें सहज मेजावरच्या छोट्या दिनदर्शिकेकडे पाहिलें. २० ऑक्टोबर ! दादा नाहींसे झाले त्या गोष्टीला बरोबर तीन महिने झाले आज. त्याच्यापुढें आठ महिन्यांपूर्वीचा तो २० फेब्रुवारीचा दिवस जस्साच्या तस्सा उभा राहिला.

□ □ □

## २

# परागची भेट

आठ महिन्यांपूर्वीचा २० फेब्रुवारीचा दिवस! दादांचा वाढदिवस. दर वर्षीं दादांच्या वाढदिवसाला त्यांचे सगळे मित्र जमायचे. कारण त्या दिवशीं दादांच्या 'सुहृद्वृंद'चाहि वाढदिवस असायचा.

दादांनीं अन् त्यांच्या मित्रांनीं मोठ्या आवडीनें सहा वर्षांपूर्वी 'सुहृद्वृंद' नांवाच्या मंडळाची स्थापना केली होती. दर महिन्याला होणाऱ्या 'सुहृद्वृंदा'च्या सभेला यायला जमलें नाहीं तरी वाढदिवसाच्या दिवशीं मात्र दादांचे सगळे मित्र असायचेच. येणाऱ्या मित्रांत दादांच्या मानसोपचारतज्ज्ञांचें प्रमाण जास्त असल्यामुळें प्रत्येकानें या वर्षांत नवे प्रयोग कोणते केले याबद्दलची चर्चा व्हायची. नवे बेत पुढें मांडले जायचे.

त्यांतच दादांचा एखादा गवई मित्र, एखादा नट मित्र असायचा. चर्चा ऐकतां ऐकतां मध्येंच तो कांहींतरी प्रश्न विचारायचा. दादांचा पुढल्या संशोधनाबद्दलचा लोकविलक्षण बेत ऐकून गमतीनें थट्टा करायचा. पण व्हायचें काय कीं, पुढल्या वाढदिवसाच्या वेळेपर्यन्त तो बेत प्रत्यक्षांत आलेला असायचा; अन् त्याबद्दल दादांचें अभिनंदन करणाऱ्या

मंडळींत त्या थट्टा करणाऱ्याचा पहिला क्रमांक असायचा. ज्या तऱ्हेनें त्यानें थट्टा केलेली असायची तितक्याच उत्साहानें तो दादांचें कौतुक करायचा. दादादि कांहीं साधेसुधे नव्हते. भारतामधले एक नांवाजलेले मानसोपचारतज्ज्ञ होते ते. त्यांनीं अनेकांच्या मनोव्यथा दूर केल्या होत्या. नवनवे प्रयोग केले होते. त्यामुळें भारतांतल्याच काय पण जगांतल्या मानसोपचारतज्ज्ञांत ते फार मोठे गणले जात.

या प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञांशीं आपली थोडीशी ओळख आहे, असें सांगतांनाहि सांगणाऱ्याला धन्यता वाटायची अन् म्हणून 'सुहृद्वृंद'च्या वाढदिवसाचें आमंत्रण मिळालें कीं कोणी येणें टाळलेंय् असें सहसा घडत नसे. उलट वाढ-दिवसाच्या दिवशीं बोलावलेल्या माणसांपेक्षां नेहमींच या ना त्या कारणानें बरींच जास्त माणसें असायचीं. अन् आलेल्या प्रत्येक पाहुण्याची बडदास्तहि तितकीच उत्तम ठेवली जायची. आयत्या वेळीं पाहुणे वाढले म्हणून गोंधळ उडालाय् असें अतुलच्या आईच्या बाबतींत कधीं घडायचें नाहीं.

वाढदिवसाची तयारीच मुळीं कितीतरी आधींपासून चालायची. अलीकडे अतुलहि या कामांत आईला खूप मदत करायचा. मेजवानीसाठीं कोणते खाद्यपदार्थ करायचे, पाहु-ण्यांची बसायची सोय कशी करायची, गच्ची कशी सजवायची, पाहुण्यांच्या मनोरंजनासाठीं कोणते कार्यक्रम ठेवायचे, याबद्दलचे त्या दोघांचे बेत कितीतरी दिवसांपासून चाला-यचे. दर वेळीं नवे पदार्थ, नवी सजावट नवा मनोरंजनाचा कार्यक्रम; किती कठीण होतें हें सगळें जमणें ! पण अतुलच्या आईला तें सगळें छान जमायचें.

मग आलेला कोणीतरी पाहुणा म्हणायचा, "हें बघ चंद्रशेखर, तूं मोठा मानसोपचारतज्ज्ञ असशील, पण तुझ्यापेक्षां वहिनींनाच लोकांचं मन चांगलं ओळखतां येतं. अरे, आपल्या या वाढदिवसाचंच बघ ना. पाहुण्यांना काय आवडेल त्याचा विचार करून वहिनी जी व्यवस्था करतात त्याबद्दल त्यांचं कौतुक करायला शब्द नाहींत !"

दुसरे कुणी म्हणायचे, "डॉक्टरसाहेब, तुमच्या घरीं वाढदिवसाला येऊन गेलं कीं मन असं प्रसन्न होत कीं पुढल्या वाढदिवसापर्यंत कामाचे डोंगरच्या डोंगर हलवतां येतात."



पाहुण्यांच्या तोंडून आईची स्तुति ऐकली कीं दादांना धन्य वाटायचें. गेल्या वेळचा वाढदिवसाचा समारंभहि असाच

थाटांत साजरा झाला होता. पाहुण्यांसाठीं योजलेली मोठी मेजवानी...करमणुकीचा उत्कृष्ट कार्यक्रम...."माणसाचा स्वभाव बदलणं सहज शक्य आहे," या दादांच्या विधानावर झालेली चर्चा...."येत्या विज्ञानपरिषदेपर्यंत मी नवं संशोधन पूर्ण करूं शकेन," हा दादांनीं प्रकट केलेला खंबीर आत्मनिश्चय...आठ महिन्यांनंतरहि या सगळ्या गोष्टी त्याला स्पष्टपणानें आठवत होत्या, अगदीं काल घडल्यासारख्या.

समारंभ संपला तसे आलेले पाहुणे आपापल्या घरीं निघून गेले अन् दुसऱ्या दिवसापासून दादांचें संशोधन सुरू झालें. दिवसाचे वीसवीस, बावीसबावीस तास ते प्रयोगशाळेंत घालवायला लागले. त्यांना जेवणखाण सुचेना, करमणुकींत त्यांचें मन रमेना, मित्रांच्या गप्पागोष्टींत रस वाटेना. रात्रंदिवस एकाच गोष्टीचा त्यांना ध्यास लागला—'माणसाचा स्वभाव बदलायचा!'

पांच महिने दादांनीं अविश्रांत श्रम करून संशोधनाचें काम पूर्ण करीत आणलें. ते मोठे खुषींत असायचे त्या काळांत. त्यांतच १९ जुलै—अतुलचा वाढदिवस. त्या दिवशीं त्यांनीं त्याला खूप नवीं पुस्तकें आणून दिलीं होतीं. त्या दिवशींच्या मुलांच्या क्रिकेटच्या सामन्यांत ते खेळले होते. एवढेंच काय, पण मुलांच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत त्यांनीं मजेदार नकला करून सगळ्यांना खूप हंसवलें पण होतें.

दुसऱ्या दिवशीं तो अन् आई उठून बघतात तों दादा घरांत नव्हते. पण त्याबद्दल कुणालाच आश्चर्य वाटलें नाहीं. कारण खूप वेळां दादांना निवांतपणानें विचार करायचा

झाला कीं समुद्रावर जाऊन ते एकटेच विचार करीत बसायचे. त्याप्रमाणेंच ते गेले असतील, असें वाटलें आईला. पण संध्याकाळ होऊनहि जेव्हां ते घरीं आले नाहींत तेव्हां आईनें तपास करायला सुरुवात केली. पण सर्वांचें एकच उत्तर–"डॉक्टरसाहेब आमच्याकडे नाहीं आले हो." अन् मग दुसऱ्या दिवशींच्या सगळ्या वृत्तपत्रांत मोठ्या अक्षरांत बातमी प्रसिद्ध झाली–"सुप्रसिद्ध मानसतज्ज्ञ डॉक्टर चंद्रशेखर बुद्धिसागर बेपत्ता !"

त्या गोष्टीला बरोबर तीन महिने झाले आज. अन् आजच पराग त्याला भेटला, अगदीं ठरवून भेट घ्यावी तसा. त्यानें तें अंकुरचें पत्र दाखवल्यापासून अतुलला असें झालें कीं, उद्यांचा दिवस कधीं उजाडतोय्.

□ □ □

# ३

## अंकुर नर्सरींत

ज्या दिवसाची अतुल मनापासून वाट पहात होता तो दुसरा दिवस अखेर उजाडला. त्या दिवशीं अगदीं खुषींतच तो जागा झाला, भल्या पहांटे. आज त्याला पराग भेटणार होता. अंकुरकडे नेणार होता. लवकर उठून अतुलनें सर्व कामें घाईघाईनें उरकलीं.

"कां रे आज घाईशी ?" आईनें त्याला विचारलें.

त्यानें केस विंचरतां विंचरतां म्हटलें, "अग परीक्षा जवळ आली ना आतां !"

"आत्तां रे कुठली परीक्षा ?" आईनें पुन्हां विचारलें.

"हीच, हीच, आपली नऊमाही परीक्षा आहे ना जाने-वारीमध्यें" अतुलनें घाईघाईनें म्हटलें, "आई ग, या परीक्षेंत किनई मी नेहमींसारखा पहिला नंबर तर मिळव-णारच पण मार्कस्‌सुद्धां जास्त मिळवणार आहें नेहमींपेक्षां, बरं का."

त्याचें बोलणें ऐकून आई समाधानानें हंसली. तें बघून त्याला फारफार बरें वाटलें. पुस्तक उघडून अभ्यासाला बसतांना मनांतल्या मनांत त्याला वाटलें, 'किती साध्या-सुध्या गोष्टींत समाधान वाटतं हिला ! मग पराग म्हणतो

त्याप्रमाणं आपण दादांना खरोखरीच एकदम घरीं घेऊन आलों तर कित्ती आनंद होईल हिला ! पण तो आनंद प्राप्त व्हावा म्हणून कधीं केली नव्हती अशी गोष्ट केली आज आपण--आईशीं खोटं बोललों.' क्षणभर अतुलच्या मनाला रुखरुख लागून राहिली. पण त्यानें विचार केला, 'जरी मी खोटं बोललें तरी त्यामागं हेतु चांगलाच आहे. अंकुरचं गुपित झांकून ठेवायचं म्हणजे पराग अन् आपण या दोघां-खेरीज तिसऱ्या कुणाला तें कळतां कामा नये. अन् तसं घडायच म्हणजे करायचं तें एकच--त्याबद्दल कुणाशींहि बोलायचं नाहीं !'

रोजची जेवणाची वेळ झाल्यावर कसेबसे चार घास त्यानें पोटांत ढकलले अन् शाळेचा रस्ता धरला. कालच्या ठिकाणीं आल्यावर तो किंचित् थबकला; पण त्याला पराग दिसला नाहीं. आतां काय करायचें ? तो तिथेंच पदपथावर थांबला. पण असें नुसतें थांबणें त्याला बरें वाटेना; म्हणून तो रस्त्याच्या कडेला असलेल्या पुस्तकांच्या दुकानाजवळ गेला. कांचेच्या मोठ्या कपाटांत मांडून ठेवलेलीं पुस्तकें बघूं लागला. कपाटांतलीं सगळीं पुस्तकें बघून झालीं. आतां निघावें, असा त्यानें विचार केला. इतक्यांत कुणीतरी आपल्या खांद्यावर हात ठेवलाय् असा त्याला भास झाला. 'पराग आला वाटतं,' असं म्हणत त्यानें मागें वळून पाहिलें. पण तो होता त्याच्या वर्गातला विजय ! विजय त्याला म्हणत होता, "अरे इतका रंगून काय बघतो आहेस एवढं ?"

"हींच, नवीं पुस्तकं," कसेंतरी त्यानें उत्तर दिलें.

विजयनें विचारलें, "शाळेंत येणार आहेस ना ?"

"हो येणार आहे तर ! " अतुलनें म्हटलें.

"चल मग," विजय म्हणाला, "सव्वादहा होऊन गले."

"तूं हो पुढं; मी आलोंच," असें बोलून अतुलनें जवळ जवळ त्याला ढकललेंच.

"आज झालंय् तरी काय तुला ? " असें म्हणत जाणाऱ्या पाठमोऱ्या विजयकडे बघून अतुलनें समाधानाचा सुस्कारा सोडला अन् त्याच्या चेहऱ्यावर स्मितरेखा उमटली. समोरून पराग येत होता.

"माझी फार वेळ वाट पहावी लागली का तुला ? " अतुलच्या जवळ येऊन त्यानें विचारलें.

"होय" म्हणून परागची नाराजी ओढवून घ्यायला नको या विचारानें अतुलनें म्हटलें, "छे, छे, आत्तां तुमच्या पुढंच आलों मी."

"हं ! मग ठीक आहे."

"आज जायचं ना आपण अंकुरकडे ?" अतुलनें विचारलें.

"अरे पण तुझी शाळा ? " डोळे मिचकावीत परागनें विचारलें. त्यावर जलदीनें अतुलनें उत्तर दिलें, "शाळा मग, आधीं भेट ! "

"चल तर. पण आधीं कॉफी घेऊ बुवा कुठंतरी," पराग म्हणाला, "शिवाय" खालच्या आवाजांत त्यानें सांगितलें, "आजहि तुझ्यासाठीं एक पत्र आहे. तें तिथंच वाचतां येईल तुला. पण आज दुसरीकडे जाऊं म्हणजे आपलं गुपित फुटायला नको. त्या कोपऱ्यावरच्या 'आनंद उपाहारगृहां'त जाऊं या, चालेल ? "

" तुम्ही म्हणाल तसं, " असें उत्तर देऊन अतुल त्याच्याबरोबर चालूं लागला.

आनंद उपाहारगृहांत शिरून ते दोघे कोपऱ्यांतल्या मेजाजवळ बसले. परागनें उपहारगृहाच्या सेवकाला कॉफी आणायला सांगितली. त्यानें ती आणून ठेवतांच परागनें म्हटलें, "आज मात्र आधीं पत्र वाच हं. " अन् खिशांतून काढलेली एक चिठी त्याच्या हातांत दिली. हिरव्या शाईत टाइप केलेलें तें पत्र अतुल वाचायला लागला,

" प्रिय अतुल,

तू माझ्याकडे कालच यायला तयार झाला होतास असं परागच्या तोंडून ऐकतांना फार बरं वाटलं. काल आला असतास तरी आपली भेट झाली नसती. काय म्हणतोस, कां ? अरे तुझ्या दादांना सोडवण्याच्या खटपटींत आहें मी, विसरलास वाटतं ? ;आज मात्र तूं येच बरं का.तुला भेटल्याशिवाय अगदीं राहवत नाहीं.

तुझा
अंकुर "

अतुल पत्र वाचण्यांत गढला आहे असें बघून परागने हळूच एक पुडी सोडली अन् कसलीशी पूड त्याच्या कॉफींत टाकली. कालच्याप्रमाणें दोनतीनदां पत्र वाचून अतुलनें त्याची घडी केली अन् शांतपणें कॉफी प्यायला सुरुवात केली.

कॉफी पिऊन कप खालीं ठेवीत पराग म्हणाला, " दोन मिनिटं आपण इथंच बसूं या का ? मी जरा सिगरेट ओढतों. "

" अवश्य, " अतुल म्हणाला. क्षणभरांत आपल्याला काय होतेंय् तेंच त्याला कळेना. त्याला सारख्या जांभया यायला लागल्या अन् दोन मिनिटांतच तो पेंगायला लागला. " काय बुवा, काल रात्रभर जागरण करून पोरानं गाण्याची मैफल ऐकली अन् आतां पेंगायला लागला. " असें आजूबाजूच्या माणसांकडे बघून मोठ्यानें म्हणत परागनें हळूच त्याला धरलें अन् बाहेर उभ्या असलेल्या मोटारच्या ड्रायव्हरला ' आंत ये ' म्हणून खूण केली. एखाद्या आजारी माणसाला धरून न्यावें तसें त्या दोघांनीं अतुलला धरलें अन् मागच्या सीटवर बसवलें. पराग ड्रायव्हरच्या शेजारीं बसला अन् गाडी सुरू झाली.

गाडी भरधांव धांवायला लागली तेव्हां पराग म्हणाला, " काय पुष्पराज, कसं झालं काम ? "

" फारच छान ! " हंसून पुष्पराज म्हणाला, " अंकुर नक्की शाबासकी देणार तुला ! "

गाडी गांवाबाहेर आली अन् फारशी रहदारी नसलेल्या रस्त्यावरून जाऊं लागली. वळणावरचें लाललाल झालेलें गुलमोहोराचें झाड, त्यापुढचें अशोकाचें झाड अन् बरेचसे छोटे बंगले गाडीनें मागें टाकले. अखेर अगदीं शांत वातावरण असलेल्या भागांत गाडी शिरली. रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या दगडी कुंपणाजवळ येऊन ती थांबली.

कुंपणाच्या आंतल्या बाजूला एक मोठा फलक लावलेला होता. त्यावर मोठ्या अक्षरांत लिहिलें होतें–" अंकुर नर्सरी " त्याखालीं त्यापेक्षां बारीक अक्षरांत लिहिलें होतें. " येथें सर्व प्रकारचीं रोपें मिळतील. " सबंध आवारांत ठिकठिकाणीं

लाल मातीचे ढीगच्या ढीग पडले होते. कांहीं ठिकाणीं तिरक्या विटा लावून केलेल्या मातीच्या बदामांत, चौकटी-मध्यें छोटीं रोपें वाऱ्यानें डोलत होतीं. त्या रोपांच्या डाव्या बाजला बऱ्याच कुंड्या ठेवलेल्या होत्या. त्यांतलीं छोटीं फुलझाडें मजेंत डुलत होतीं; हलत होतीं. उजव्या बाजूला चिकूचीं व आंब्याचीं कलमें ठेवलेलीं होतीं. या सगळ्या रोपांची रचना मोठी सुरेख होती, त्यामुळं एखाद्या छानदार बागेंत आल्यासारखेंच वाटायचें. बाग जिथें संपली होती तिथें अंकुर नर्सरीची छोटी कचेरी होती. कचेरीच्या मागच्या बाजूला गर्द आंबराई होती.

नर्सरीच्या प्रवेशद्वारामधून पुष्पराजनें गाडी आंत घेतली अन् आंबराईच्या मध्यभागीं असलेल्या प्रशस्त बंगल्याजवळ थांबवली. परागनें खालीं उतरून मागचें दार उघडलें. अतु-लला गाढ झोंप लागली होती. पुष्पराजनें अन् परागनें अतुलला धरून बंगल्याच्या प्रवेशद्वाराजवळ आणलें अन् पायऱ्या उतरून त्यांनीं त्याला भुयारांत नेलें. क्षणभर थांबून त्यांनीं समोरच्या भितीकडे पाहिलें. भितीवर प्रकाशझोत पडला. क्षणार्धांत त्यावर हिरवीं अक्षरें झळकलीं " शाबास! शाबास ! " लगेच सूचना आली, " त्याला दोन नंबरच्या खोलींत झोंपवा. " डाव्या बाजूलाच दोन नंबरची खोली होती. तिथल्या खाटेवर त्या दोघांनीं अतुलला झोंपवलें. " आतां झोप हवा तेवढा वेळ, " असें म्हणत ते खोलीबाहेर निघून गेले.

७६६२० ... ३०।३।०७

# ४

## विलक्षण सुटका

गार वाऱ्याची झुळूक अंगाला लागल्याबरोबर अतुलनें डोळे उघडले अन् सभोंवार पाहिलें. परत डोळे मिटून दोन-चार मिनिटें तो तसाच पडून राहिला. रोजचीच संवय होती तशी त्याला. रोज त्याची आई जवळ येऊन म्हणायची, "अरे अतुल, कधीं उठणारेस बाबा ? अगदीं सूर्यवंशी व्हायला लागलाहेस बरं का तूं !" मग हंसत हंसत तो उठायचा.

'आज आईची हांक अजून कशी ऐकूं येत नाहीं बरं ? कीं काल लवकर उठण्याचा निश्चय जाहीर करूनहि आज आपण बराच वेळ झोंपून राहिलों म्हणून आई रागवली ? हं, तसंच दिसतंय्.' अतुलनें डोळे उघडले. झटक्यांत तो खाटेवर उठून बसला. अन् मनाशींच म्हणाला, 'अरे ही आपली खोली दिसत नाहीं ! म्हणजे मी आहें तरी कुठं ?'

मग त्याला सारें आठवूं लागलें. सकाळीं आपण घरून निघालों. रस्त्यांत पराग भेटला. नंतर कॉफी घेतली. पुढं काय झालं बरं ? छे ! कांहीं आठवत नाहीं. हो 'सिगरेट संपेपर्यंत थांब, मग आपण निघूं', असं पराग म्हणाला होता खरा. नंतर ? नंतर आपल्याला खूप जांभया यायला लागल्या, खूप झोप येते आहे असं वाटलं. अन् त्यानंतर ? त्यानंतरचं

कांऽहीं आठवत नाहीं. विचारांच्या भरांत खाटेवरच्या उंच दांडीवर त्यानें हात आपटला अन् काय आश्चर्य! गोड आवाजांत त्याच्या कानावर शब्द आले, "नमस्ते!" अन् त्यामागोमाग खोलीभर दिसला तो सुंदर निळसर प्रकाश.

आपल्या खाटेजवळ कुणीतरी उभें आहे असें त्याला वाटलें. निरखून त्यानें पाहिलें. अनेक छोटींछोटीं यंत्रें जोडून तयार केलेला एक यांत्रिक मानव त्याच्यापुढें उभा होता. शुभ्र विजार अन् हिरवट बुशशर्ट असा त्याचा पोशाख होता.



बुशशर्टवर छोटचाछोटचा कपबशांचीं चित्रें होतीं. त्यांमधून वाफा येत असलेल्या दाखवल्या होत्या. नमस्कार करीत त्या यांत्रिक मानवानें त्याला म्हटलें, "माझं नाव गरमा गरम.

आपल्यासाठीं कोणतं गरम पेय आणूं ? चहा, कॉफी, कोको, दूध ?"

"सध्यां तरी कांहींच नको मला," अतुलनें हंसून उत्तर दिलें.

"मग हा गारेगार तुमच्यासाठीं थंड पेय आणील," गरमागरमचे हे शब्द संपतात न संपतात तोंच दुसरा एक यांत्रिक मानव पुढें आला. पांढरीशुभ्र विजार अन् पांढरा बुशशर्ट त्यानें घातला होता. पण त्याच्या बुशशर्टवर थंड पेयांच्या बाटल्यांचीं चित्रें होतीं. बाटल्यांतून गवताच्या काडचा (स्ट्रॉ) घातलेल्या दाखवल्या होत्या.

गारेगारनें पुढे येऊन म्हटलें, "गोल्ड स्पॉट, लेमन, ऑरेंज, मँगोला, सोसयो, कोकाकोला काय आणूं ?"

"कांहीं नको," हे अतुलचे शब्द ऐकल्याबरोबर हळूहळू चालत ते दोघे यांत्रिक मानव कोपऱ्यांत जाऊन उभे राहिले.

त्या दोघांच्या हालचाली पाहून अतुलला फार मजा वाटत होती. "मी आहें तरी कुठं ? " मोठ्यानें तो म्हणाला.

त्याच्या समोरच्या भिंतीवर शुभ्र प्रकाशाचा झोत पडला आणि हिरवीं अक्षरें त्यावर दिसायला लागलीं–"तूं अंकुरच्या बंगल्यांत आहेस." तें बघूनहि अतुलला मजा वाटली.

किती वाजले तें बघण्यासाठीं म्हणून त्यानें मनगटावरचें घड्याळ पाहिलें. "सव्वा तीन ! अरे बापरे ! म्हणजे आज शाळेला म्हणून जे आपण बाहेर पडलों ते इथंच आहोंत. शाळाहि चुकली. अंकुरचीहि भेट नाहीं झाली. झोंपेंत मात्र

वेळ गेला बराच. चला आतां. कांहीं नको त्या अंकुरला भेटायला. घरींच जाऊं या आतां," तो थोडा या मोठ्यानें म्हणाला.

परत मघांसारखा प्रकाशझोत भिंतीवर पडला आणि त्यामागोमाग हिरव्यागार अक्षरांतलें वाक्य दिसलें–"अंकुरच्या भेटीपूर्वींच घरीं निघालास अतुल?"

"पण आतां अंकुरची भेट होण्यासाठीं काय करावं?" त्यानें विचारलें. हिरव्या अक्षरांनीं सुचवलें "तुझ्या खोलींतल्या भरारीबरोबर माझ्याकडं यावं!"

भिंतीवरचीं हिरवींगार अक्षरें नाहींशीं होताहेत तोंच आणखी एक यांत्रिक मानव तुरुतुरु चालत पुढें आला. त्यानें वांकून नमस्कार करीत म्हटलें, "मी भरारी. आपण चलणार ना?"

अतुल उठून त्याच्याजवळ गेला तशी त्यानें पाठ फिरवली अन् खोलीच्या दुसऱ्या दरवाज्यांतून तो बाहेर पडला. त्याच्यामागोमाग अतुल आला. "चालायची जरूर नाहीं," भरारी म्हणाला. अन् काय आश्चर्य, खोलीपुढचा रस्ता आपोआप पुढें पुढें सरकायला लागला. रस्त्यांतल्या गडद काळोखानें मात्र अतुलच्या जिवाचा थरकांप झाला.

पुढेंपुढें सरकणारा रस्ता अखेर थांबला. उजव्या बाजूच्या प्रशस्त दरवाजालगतची विजेची घंटा भरारीनें दाबली. पण त्यांतून 'कर्रर,' असा आवाज येण्याऐवजीं गोड शब्द आले "मी येऊं का?" त्यामागोमाग शब्द आले "सुस्वागतम्, या." दिवाणखान्याचें जाड कांचेचें दार उघडलें गेलें "आंत जा." भरारीनें म्हटलें. आंत हिरवागार प्रकाश पडला होता.

हा दिवाणखाना म्हणजे भलीमोठी प्रयोगशाळाच होती. त्यांत भिंतीलगत मोठमोठीं कपाटें होतीं. त्यांतून शास्त्रीय उपकरणें, औषधें, रसायनें दृष्टीस पडत होतीं. मोठमोठ्या प्रशस्त मेजांवर छोट्या कुंड्यांतून कांहीं फुलझाडें तशींच कांहीं झुडुपें ठेवलीं होतीं. मेजाच्या मध्यभागीं एक उंचसा माणूस रसायनांचें मिश्रण करीत बसला होता. त्यानें तोंडावर एक प्रकारचें कापडाचें आच्छादन घातलें होतें. त्याच्या दोन्ही बाजूंचे बंद मागच्या बाजूला बांधून टाकलेले होते. आच्छादनांतूनहि लक्षांत येत होतें तें त्याचें धारदार नाक अन् छान निगा राखलेली दाढी. ' या दोन्ही गोष्टी असलेला माणूस आपण कुठेंतरी पाहिला आहे '; अतुलच्या मनांत आलें पण त्याच्याकडे पुन्हां पुन्हां बघूनहि आपण त्याला कुठें बघितलेंय् तें अतुलला आठवेना.

" हाच अंकुर, " भरारी हळूच म्हणाला.

" नमस्ते, " अतुलनें म्हटलें.

आपलें काम चालू ठेवीत अंकुरनें हंसून उलट म्हटलें, " नमस्ते ! आलास म्हणायचा तूं ? "

" यायलाच हवं होतं, नाहीं का ? " अतुलनें विचारलें.

घाईनें अंकुर उत्तरला, " तर ! तर ! "

" दादांची भेट करवून देतों, असं तुम्ही लिहिलं होतंत, " अतुल बोलूं लागला, " तें वाचून आल्याशिवाय राहावेनाच मला. "

" अगदीं साहजिक होतं तें, " अंकुरनें मान वर न करतांच उत्तर दिलें.

" बरं, " अतुलनें विचारलें, " दादांची काय बातमी ? "

" G. O. K. ! " अंकुरनें एवढींच अक्षरें उच्चारलीं.

अतुलनें विचारलें, " म्हणजे ? "

अंकुरनें आपलं काम चालू ठेवीतच, सांगितले " God onry knows ! " ( फक्त परमेश्वरालाच माहीत ! )

" अहो, पण कालच्या पत्रांत तर तुम्ही त्यांना संकटांतून सोडवतों म्हणून लिहिलं होतंत ना ? " अतुलनें विचारलें.

" हो, लिहिलं होतं. पण आपला प्रत्येक अंदाज बरोबर ठरतो असं थोडंच आहे ? " आवाजांत थोडासा आपलेपणा आणून त्यानें म्हटलें, " खूप प्रयत्न केला मीं, पण प्रयत्नांना यश नाहीं आलं. कबूल केल्याप्रमाणं तुझी अन् दादांची भेट घडवणं नाहीं जमलं. माफ कर मला. पण काय रे, तूं आईला सांगितलं होतंस का इथं येणार म्हणून ? "

" नव्हतं सांगितलं, " अतुलनें खरें तेंच सांगितलें.

" तें बरं केलंस्. "

" कां बरं ? "

" अरे त्यांना उगाच आणखी वाईट वाटायचं. "

" तसाच विचार मनांत आला माझ्या. "

" काय रे अतुल, " अंकुरनें विचारलें, " तुझ्या आईला फार दुःख झालं असेल नाहीं दादा बेपत्ता झाल्यापासून ? "


" फार म्हणजे काय अगदीं फारच, " अतुलनें म्हटलें, " रात्रंदिवस चैन पडत नाहीं तिला. पोलिसांनाहि दादांचा शोध लावणं कसं जमलं नाहीं याचं आश्चर्य वाटतंय् आम्हांला. "

" साहजिक आहे. "

" पण दादांना कुणीं पळवलं असावं ? अन् कशासाठीं ? "

" सध्यां तरी तुला एवढंच सांगतों कीं त्यांचं तें नवं संशोधन चालू होतं ना, त्याचा या प्रकरणाशीं कांहीं तरी संबंध असावा, " त्यानें म्हटलें.

अतुलनें लगेच विचारलें, " मग दादांना सोडवायचं कसं ? "



" छान प्रश्न विचारलास, " अंकुर खूष होऊन म्हणाला, " मला वाटतं, दादांच्या नव्या संशोधनाबद्दलचीं कागदपत्रं त्या लोकांना आपण दिलीं म्हणजे ते दादांना सोडतील असा अंदाज आहे माझा. तशी वेळ आली तर काय करायचं ? "

" अर्थात् तीं कागदपत्रं देऊन दादांना सोडवायचं, " अतुलनें विचार न करतांच घाईनें उत्तर देऊन टाकलें.

अंकुरनें विचारलें, " म्हणजे तें काम तूं करशील ? "

" अर्थात्, " अतुल बोलला.

अंकुरनें विचारलें, "मी इथं बोलावीन तेव्हां येशील ?"

"अवश्य !" अतुल म्हणाला.

"मग करतों मी प्रयत्न. तूं सध्यां इथंच रहा," असें म्हणून अंकुरनें भरारीला हांक मारली अन् म्हटलें, "याला पंधरा नंबरच्या खोलींत ने."

ते दोघे प्रयोगशाळेच्या बाहेर आले. मघाप्रमाणेंच खोली-पुढचा रस्ता भरभर पुढें सरकूं लागला. भरारीनें त्याला पंधरा नंबरच्या खोलींत आणून सोडलें. तिथें एक त्याच्याच वयाचा छोटा मुलगा होता. तो अतुलच्या कानांत कुज-बुजला, "मोठ्यानं बोललास तर इथलं बोलणं ऐकूं जाईल अंकुरला. तेव्हां कानांतच सांग. तुला या ठिकाणीं कुणीं आणलं ?"

"मीच आलों आपणहून," आपलें गुपित फुटूं नये म्हणून अतुलनें त्या मुलाच्या कानांत सांगितलें.

"मग फार मोठी चूक केलीस तूं," तो मुलगा कुज-बुजला, "अरे, हा अंकुर प्रयोग करतोय् कसले तरी. रोज हजार औषधं पाजून असा हैराण करतो हा."

"छे, मला नाहीं. खरं वाटत," अतुल पुटपुटला.

"तुला अनुभव आला म्हणजे पटेल," तो मुलगा कळवळून बोलूं लागला, "अरे, या बाजूच्या अकरापासून पंधरा नंब-रच्या खोल्यांतून लहान लहान मुलांना यानं आणून ठेवलं आहे. शिवाय हल्लीं पराग पुष्पराजवरहि मधूनमधून प्रयोग करतो. स्वत:च्या प्रयोगासाठीं रोज दिवसांतून चारदां तो आम्हांला जीं रसायनं पाजील तीं मुकाटपणं प्यावीं लागतात."

"अन् अन्न-पाणी ?" अतुलनें विचारलें.

"कुठलं आलंय् !" त्या मुलानें सांगितलें, "त्या रसायनांनीं शरीराची अशी आग होते आहे म्हणतोस. आतां तुझ्यावरहि होईल प्रयोग. त्यापेक्षां आपण असं करूं. आतां आठ वाजतां भरारी मला प्रयोगशाळेकडं न्यायला आला कीं तूंहि माझ्या मागोमाग ये. आपण जरा मागं रेंगाळूं अन् देऊं त्याच्या हातावर तुऱ्या. प्रयोगशाळेजवळून जाणाऱ्या एका छोटया पाऊलवाटेनं आपण आंबराईंत सहज पोंचूं. पटतंय् ?"

"नाहीं !" अतुलनें ठसक्यांत उत्तर दिलें.

"मग इथंच राहिलं पाहिजे आपल्याला," तो मुलगा निराशेनें उद्गारला.

"काय मूर्ख आहे हा !" अतुल मनाशीं पुटपुटला.

चार वाजतां दार उघडल्याचा आवाज झाला. भरारीनें आंत येऊन त्या मुलाला धरून नेलें. दहा मिनिटांनीं तो मुलगा परत खोलींत आला तो कांहींशा बेहोश अवस्थेंतच. "पाणी," कण्हत कण्हत तो मोठ्यानें ओरडला. क्षणांत भिंतीवर प्रकाशझोत पडला अन् त्यामागोमाग हिरवीं अक्षरें– "तुरुंगांत कैद्यानं कुठलीहि गोष्ट मागायची नसते, मिळेल ती घ्यायची असते."

तो मजकूर वाचल्याबरोबर अतुलच्या जिवाचा थरकांप झाला. 'म्हणजे अंकुरनं आपल्यालाहि कैद केलं तर !'

'आतां उद्यांपासून आपल्यावरहि प्रयोग सुरू करणार कीं काय हा ?' या विचारानें अतुल थोडा गडबडला.

"ए मुला !" हळूंच तो कुजबुजला.

"छोटू आहे माझं नांव," त्या मुलानें म्हटलें.

" बरं छोटू, तुझा मघांचा बेत मान्य आहे मला, " अतुल पुन्हां कुजबुजला.

छोटूनें म्हटलें, " ठीक. आज रात्रीं करूं प्रयत्न. रात्रीं आठ वाजतां भरारी पुन्हां प्रयोगशाळेंत नेईल मला तेव्हां तूंहि ये माझ्या मागोमाग. "

आठ वाजेपर्यंतचा वेळ त्या दोघांनीं कसा तरी घालवला. आठ वाजतां दार उघडल्याचा आवाज झाला आणि त्यापाठोपाठ भरारीनें आंत प्रवेश केला. त्यानें छोटूला " चल " म्हणून खुणावलें. छोटू निघाला. छोटूच्या मागोमाग अतुलहि बाहेर पडला. खोलीपुढचा रस्ता पुढेंपुढें सरकूं लागला.

प्रयोगशाळेजवळ आल्याबरोबर छोटूनें जोरांत धक्का देऊन भरारीला खालीं पाडलें; अन् ते दोघे छोटया वाटेनं आंबराईकडे धांवूं लागले. इतक्यांत धोक्याचा इशारा देणारी



घंटा वाजायला लागली. त्याबरोबर पुष्पराज अन् पराग धांवत आले. त्यांनीं छोटूला पकडलें. तें बघून जीव घेऊन अतुल पळत सुटला अन् धांवत धांवत प्रवेशद्वारामधून बाहेर पडला. हमरस्त्याला लागल्यावर त्याला एका हॉटलसमोर धान्याच्या पोत्यांनीं भरलेलो ट्रक उभी असलेली दिसली. उडी मारून तो ट्रकमध्यें चढला आणि पोत्यांत दडून बसला. ड्रायव्हरचें खाणेंपिणें आटोपल्यावर ट्रक सुरू झाली. ताज्या-तवान्या झालेल्या ड्रायव्हरनें वेगांत ट्रक सोडली; पण पंधरा मिनिटांतच ती एकाएकी थांबली. ट्रकमध्यें कांहींतरी बिघाड झाल्यामुळे ड्रायव्हरला ती थांबवावी. लागली होती. अतुलनें या संधीचा फायदा घेतला अनायासे तो घराजवळच आला होता. अतुल खालीं उतरला आणि घाईघाईनें आपल्या घरांत शिरला.

त्याच्या मनाला रुखरुख लागून राहिली होती. सकाळीं आयुष्यांत प्रथमच तो आईशीं खोटें बोलला होता. त्यानंतर कुणाचीहि परवानगी न घेतां त्यानें शाळा चुकवली होती. बरें शाळा चुकवून दादांची भेट झाली असती तरी कांहीं हर-कत नव्हती. पण घडलें होतें काय ? दादांची भेट तर झाली नव्हतीच, उलट एका संकटांत मात्र तो सांपडला होता. त्यांतूनहि तो बाहेर पडला होता. संकटांतून त्याला सोडव-णारा छोटू मात्र तिथेंच अडकला होता.

मनांतल्या मनांत त्याला वाटलें–' आजच्या दिवसांत जें जें कांहीं घडलं तें तें सगळं आईला सांगून टाकावं अन् मोकळं व्हावं; पण तसं नको. एकसारखं वाटतंय् छोटूसारखं दादांनाहि अंकुरनं प्रयोगासाठीं आपल्या बंगल्यांत कैद करून ठेवलं नसेल ना ? असं असेल तर आपल्यालाच शोध

घ्यायला हवा त्या गोष्टीचा. बस्स, ठरलं. सध्यां आईला कांहींच सांगायचं नाहीं. पण आत्तांच्या उशिराचं कारण काय सांगायचं आईला ? अन् आजच्या गैरहजेरीचं कारण काय सांगायचं उद्यां सरांना ? सांगू कांहींतरी. म्हणजे आणखी एकदां खोटं बोलायचं ! दादा सांपडेपर्यंत किती वेळां खोटं बोलायला लागणार आहे कुणास ठाऊक ! '

घरांत येऊन त्यानें पुस्तकें ठेवलीं. मुकाट्यानें हातपाय धुतले. " अरे किती उशीर तुला यायला हा. इतका वेळ रे कसला अभ्यास करतां ! " आईचे हे शब्द ऐकून त्याला वाटलें, सांगून टाकावें सगळें हिला. पण पुन्हां त्यानें मनाला आवर घातला.

क्षणांत त्याच्या मनांत काय विचार आला कुणास ठाऊक, जेवतां जेवतां आईला तो म्हणाला, " आजपासून दादांच्या प्रयोगशाळेंत बसणार आहें मी अभ्यासाला, चालेल ? "

" कां ? प्रयोगशाळेंत कां ? " आईनें विचारलें.

अतुलनें म्हटलें, " अग, प्रयोगशाळेंत बसलं ना कीं त्यांच्या सहवासांत असल्यासारखं वाटतं. "

" घरांत नाहीं वाटतं वाटत ? मला तर या घराच्या कणाकणांत ते भरून राहिले आहेत असं वाटतं, " आई म्हणाली.

अतुल त्यावर कांहींच बोलत नाहीं असें बघून तिनें म्हटलें, " कुठंहि बस. माझं कांहींच म्हणणं नाहीं. "

" तर मग आजपासूनच बसतों मी प्रयोगशाळेंत, " असें म्हणत त्यानें जेवण उरकलें अन् पुस्तकें घेऊन तो प्रयोगशाळेंत येऊन बसला.

अभ्यासासाठीं म्हणून अतुल प्रयोगशाळेंत येऊन बसला

खरा; पण अभ्यासाला सुरुवात करावी असें कांहीं त्याला वाटेना. राहून राहून त्याच्या मनांत येत होतें—'दादांच्या नव्या संशोधनाचा अन् बेपत्ता होण्याचा खरोखरच कांहीं संबंध आहे का? कीं मघाशीं आपल्या मनांत आलं त्याप्रमाणं अंकुर त्यांच्यावर प्रयोग करतोय् असं म्हणायचं? पण मग त्यानं आपल्याला त्याच्या भेटीला कशाला बोलावलं? अन् नंतर डांवलं तरी कां? छे, विचार करून डोकं फुटायची वेळ आली पण कांहीं लक्षांत येत नाहीं.'

विचारांच्या भरांत त्यानें समोरच्या मेजावर डोकें टेकलें. त्याला गाढ झोंप लागली. बऱ्याच वेळानें तो जागा झाला तो कुणाच्या तरी धक्क्यानें. डोळे उघडून त्यानें पाहिलें, प्रयोगशाळेच्या खिडकींतून कुणीतरी उंच माणूस उडी टाकून बाहेर पळत होता. त्या पळणाऱ्या माणसाची काळीभोर आकृति तेवढी त्याला दिसली अन् त्याच्यामागून एक कोणी तरी खेडवळ गृहस्थ पळत जातांना त्याला दिसले.

समोरच्या ज्या कपाटांत दादांच्या संशोधनाचीं कागदपत्रें असायचीं तें सताड उघडें पडलें होतें. आंतलीं कागदपत्रें कोणीतरी इकडेतिकडे विखरून टाकलीं होतीं. 'त्या दोघांनीं यांतलीं कागदपत्रं पळवलीं कीं काय? ती काळी आकृति म्हणजे अंकुर तर नव्हता? मग त्यानं आज आपल्याला भेटीला कशाला बोलावलं? अन् ते खेडवळ गृहस्थ कोण?'

विचारांचा गुंता आणखीनच वाढला. घड्याळांत एकचा ठोका पडला. मग आरामखुर्चींत बसल्याबसल्या त्याला कधीं झोप लागली तें त्याचें त्यालाच कळलें नाहीं.

□ □ □

५

# हे कोण आजोबा ?

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अतुल जागा झाला तो आकाशवाणीवरच्या सनईच्या सुस्वर सुरांनीं.

'अरे!' मनाशींच तो म्हणाला, 'सबंध रात्रभर मीं आरामखुर्चीत बसूनच झोप घेतली म्हणायची. पण रात्रीं तो दाढीवाला कोण येऊन गेला? कीं स्वप्न पडलं आपल्याला? पण त्यानं कपाटांतले कागद उसकटून टाकले होते, नाहीं का? हो, समोरच्या दादांच्या कपाटांतले कागद बाहेर पडलेले दिसताहेत खरे. मग? आईला सांगू या कीं काय? कीं आपण अंकुरच्या बंगलीला आज भेट देऊं या? हं. असंच करूं. पण म्हणजे मग हे कागद नीट रचून ठेवायला हवेत जस्सेच्या तस्से, पण वेळ कुठं आहे एवढा!,

मनाशीं असेंच कांहींतरी पुटपुटत कपाटाबाहेर पडलेले कागद अतुलनें कसेतरी रचून ठेवले आणि प्रयोगशाळेंतून तो बाहेर आला.

"किती झाला अभ्यास काल?" आईनें हंसून त्याला विचारलें.

सकाळच्या प्रहरींच खोटें बोलणें नको या उद्देशानें तो नुसताच हंसला. मनांत तो म्हणाला, 'हा हसून वेळ मारून

नेण्याचा मार्ग बरा. खरंहि बोलायला नको अन् खोटंहि सांगायला नको."

शाळेंत गेल्यावरहि, घडलें तें असेंच. वर्गशिक्षकांनीं त्याला विचारलें, "काय रे, काल शाळेंत नाहीं आलास? बरं नव्हतं का?" तेव्हांहि तो असाच नुसता हंसला.

सबंध दिवसभर अभ्यासाकडे लक्ष देण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करूनहि कोणत्याच तासाकडे अतुलचें नीट लक्ष लागेना. प्रत्येक विषयाच्या शिक्षकांचें शिकवणें तो ऐकत होता...फलकावरचा मजकूर लिहून घेत होता, त्यांनीं सांगितलेले वर्गपाठ करीत होता—पण त्याचें मन मात्र अंकुर नर्सरीच्या आवारांत घुटमळत होतें—तिथल्या त्या हिरव्यागार अक्षरांतल्या सूचना—ते गरमागरम अन् गारेगार—पुढेंपुढें सरकणारा रस्ता. पुन्हां पुन्हां त्याला तें सर्व आठवत होतें. मित्रांना अगदीं रंगवून सांगण्यासारखें त्यानें कितीतरी पाहिलें होतें, अनुभवलें होतें. पण तें कुणाला सांगायचें नव्हतें, सांगून चालणार नव्हतें. अन् म्हणूनच वर्गांतल्या अभ्यासाकडे लक्ष नसूनहि तो लक्ष असल्यासारखें दाखवीत होता. शिक्षकांच्या तोंडाकडे बघत होता, मधूनमधून मान हलवीत होता. शिक्षकांच्या विनोदावर वर्ग खळाळून हसला कीं हंसत होता. अखेर साडेपांचला शाळा सुटली. मोठ्या खुशींत शीळ वाजवीत तो बाहेर पडला. घराच्या रस्त्यानें चालूं लागला.

इतक्यांत त्याच्या कानांवर शब्द आले, "अव सायेब, ह्यो पत्त्या वाइच वाचून दावा की."

कांहींसें थबकून अतुलनें मागें वळून बघितलें. कालचेच

ते खेडवळ गृहस्थ त्याच्यासमोर उभे होते. एक छोटी छापील जाहिरात त्याच्यापुढें करून पत्ता वाचा म्हणत होते.

कपाळाला आठ्या घालीत अतुलनें जाहिरात हातांत घेतली. वाचायला सुरुवात केली. तो चांगलाच चमकला. त्या गृहस्थांनीं दिलेली ती जाहिरात म्हणजे अंकुर नर्सरीचें प्रचारपत्रक होतें. त्यांत म्हटलें होतें–

विविध प्रकारच्या देशी व विदेशी वनस्पतींचीं
रोपें मिळण्याचें एकमेव ठिकाण

**अं कु र न र्स री**

आमचेकडे सर्व प्रकारचीं खतें व
बी-बियाणें मिळतील.
भेट द्या अन् खात्री करून घ्या.

जाहिरात वाचून झाल्यावर त्या गृहस्थांकडे निरखून बघत अतुलनें विचारलें, " आजोबा, तुम्हांला हो कशाला हवा हा पत्ता ? "

" अव कशाला म्हून काय इचारता ? ततं जाऊनशान् न्हान न्हान झाडं इकत घेनार हाय, " चेहऱ्यावर भोळा भाव आणीत त्या आजोबांनीं उत्तर दिलें.

" अस्सं ?, " अतुलनें म्हटलें, " खरं सांगू, मला नाहीं हा पत्ता माहीत. दुसऱ्या कुणाला विचारा बाबा. "

" आत्तां काय करावं ? अवं दुसरं कुनी सांगना म्हून तुम्हास्नी इचारलं. वाइच दावा की रस्ता गरिबाला, " आजोबा म्हणाले.

' " छे छे, मी नाहीं येत तिथं, " त्यावर अतुलनें निश्चय-पूर्वक सांगितलें.

" का व ? " आजोबांनीं पुन्हां विचारलें.

अतुलनं म्हटलें, " मला नाहीं सांपडायचं तें. "

" अव शोधल्याबिगर कसं भ्येटेल. वाइच चला आपुन माझ्यासंगं. " असें म्हणत आजोबांनीं त्याचा हातच धरला. तेव्हां मात्र कांहींशा अनिच्छेनेंच अतुल त्यांच्याबरोबर चाला-यला लागला.

गांवाच्या बाहेर आल्यावर आजोबांनीं म्हटलें, " सायब, योक सवाल इचारू का ? "

" विचारा कीं, " अतुल म्हणाला.

आजोबांनीं विचारलें, " का व, तुमी कंदी आनलीं कीं न्हाई रोपं अंकुरकडनं ? "

" नाहीं बुवा. कां ? " अतुलनें उलट विचारलें.

" न्हाई ? मग बेस्तरवारी तुमी तत कशाला व गेला व्हता ? " आजोबांनीं अगदीं सहज विचारावें तसा प्रश्न केला.

" तें विचारणारे तुम्ही कोण ? माझा अगदीं खाजगी प्रश्न आहे तो ! " अतुलनें रागावून उत्तर दिलें त्यांना.

" असल, " आजोबा म्हणाले, " पर मला त्या इषीच इचारायाच होवे. "

" तें कां ? " अतुलनें आश्चर्यानें विचारलें.

"पोरा," आजोबांनीं म्हटलें, "तुजं भलं कशामंदी हाये त्ये जानतो म्हून. पोरा, अंकुरच्या नादीं नगं लागू."

"मग नादीं कुणाच्या लागू ?" अतुलनें विचारलें.

"कुनाच्या ?" हंसत ते म्हणाले, "माऽज्या."

अतुलनं म्हटलें, "तुम्ही कोण एवढे मोठे लागून गेलांत?"

"तुझ्या दादांचा मैतर," आजोबा म्हणाले, "पोरा, अक्षी डोळ्यानं पायलेली वार्ता सांगतों. काल हुसकाफसक करुनशान् बी कागदं भ्येटली न्हाइत म्हून लइ गरम झालाये अंकुर."

"तुम्हांला हो कसं कळलं ?" अतुलच्या आश्चर्याला पारावार उरला नाहीं.

"हाऽ" आजोबा म्हणाले, "त्याच्यावर अक्षी वाच ठिऊन हाय म्या."

"खरं ?" अतुल केवढ्यांदा तरी उद्गारला.

"तर! आतां बगशीलच तूं;" ते म्हणाले, "पोरा, आज रातच्या टायमाला जाऊ आपुन अंकुरकडं. तुला दावतो त्याची एकेक प्रकारनं. अन् त्ये बगत असतानाच दादास्नीबी सोडवू तुज्या." असें म्हणत जवळच्या एका गल्लींत ते म्हातारे बाबा वळले अन् अतुल आपल्या घराच्या रस्त्याला लागला.

* * *

## ६

# पुतळ्याचें रहस्य

'खरंच विश्वास तरी ठेवायचा कुणावर? अंकुरवर कीं आजोबांवर? कीं दोघांच्यावरहि विश्वास न ठेवतां आपणच यांतून मार्ग काढायचा?' जेवण उरकलें तरी अतुलच्या मनांतून ते विचार जाईनात. त्याला अभ्यास सुरू करावासा वाटेना.

'आज रात्रीं अंकुरकडं जाऊं' असें आजोबा म्हणत होते. त्यांच्याबरोबर जाण्याचा विचार करीत अतुल येरझारा घालायला लागला. त्याच्या दादांची ती प्रयोगशाळा अद्य-यावत् सुसज्ज अशी होती; पण आज दादांच्याशिवाय ती रिकामी रिकामी वाटत होती.

सकाळीं कपाटांत कसेतरी कोंबलेले कागद त्यानें आतां बाहेर काढले. पुस्तकें, फाईली इ. वस्तु त्यानें बाहेर काढल्या. कपाट रिकामें झालें. कपाटाच्या मागच्या फळीवर आंतल्या बाजूला तें तयार करणाऱ्या कंपनीचें नांव असलेला पत्र्याचा तुकडा लावलेला होता. आंतल्या बाजूला असलेला पत्र्याचा तो तुकडा पाहिल्याबरोबर कांहींशा कुतुहलानें अतुलनें त्याला हात लावला. त्याबरोबर तो दूर सरकला अन् लाकडावर

दिसलें तें किल्ली लावून फिरवण्यासाठीं केलेलें भोंक ! अतुलला त्या गोष्टीचें फार आश्चर्य वाटलें.

"हें काय आणखी गौडबंगाल ?" मनाशींच तो म्हणाला, "या भोंकांत कुठली किल्ली घालून फिरवायची?"

झटकन् त्यानें प्रयोगशाळेंतलें किल्ल्यांचें जुडगें घेतलें आणि त्यांतल्या किल्ल्या लावून पाहिल्या. पण कुठलीहि किल्ली त्या भोंकांतून फिरेना. मग त्यानें मेजाचे खण उघडले. कपाटांत पाहिलें. बराच वेळ इकडे तिकडे किल्ली बघितली पण ती त्याला कुठेंच सांपडेना. किल्ली शोधण्याची एकच जागा आतां राहिली–रेडिओची पेटी. तिथेंहि नाहीं म्हणजे मग कुठेंहि नाहीं असें समजायला हरकत नव्हती.

किल्ली पेटींतहि दिसली नाहीं. पण इतक्यांत अतुलचें लक्ष आणखी एका वस्तूकडे गेलें. रेडिओच्या पेटीवरचा तो छोटासा शिराळशेटाचा पुतळा ! दादांच्या एका विनोदी मित्रानें भेट दिलेला. तिथं तर दडवून ठेवली नसेल किल्ली ? अतुलनें सहज खुर्चीवर चढून तो पुतळा काढला अन् त्याचें निरीक्षण केलें. त्या पुतळ्याच्या पोटावरची ती बारीकशी चीर. त्यानें तिथें हात दाबला आणि काय आश्चर्य ! एखाद्या पेटीचें झाकण उघडावें तसें पुतळ्याच्या पोटावरचें वर्तुळाकार झाकण निघालें. तिथें ठेवलेली एक किल्ली मिळाली. हीच तर नसेल ती किल्ली ? मनाशीं असें म्हणत अतुलनें ती हातीं घेतली.

प्रथम त्यानें प्रयोगशाळेचीं सर्व दारें व खिडक्या लावून घेतल्या. कपाटाच्या त्या किल्लीच्या भोंकांत किल्ली घालून फिरवल्याबरोबर हळूहळू ती लाकडाची फळी बाजूला झाली.

दार उघडल्यावर रस्ता दिसायला लागावा तसा जायला मार्ग दिसायला लागला. हातांत विजेरी घेऊन अतुल चालायला लागला. समोर त्याला दिसला तो प्रशस्त दिवाणखाना. वरच्या प्रयोगशाळेचाच छोटासा नमुना भासावा असा. तिथल्या मोठ्या मेजावर खूप रसायनें होतीं. तशाच बऱ्याचशा कोऱ्या रोजनिशाहि पडलेल्या होत्या.

" आज एवढंच पुरे " असें म्हणून अतुल बाहेर आला· कपाटांतलें सामान त्यानें पहिल्यासारखें लावून ठेवलें. किल्ली बुद्धाच्या पोटांत ठेवून दिली. ' म्हणजे आपल्याहि घरात भुयार आहे म्हणायचं ! '—त्याच्या मनांत विचार आला, ' हं. दादांनीं आपल्या नव्या संशोधनाचं सगळं गुपित इथंच ठेवलं असावं. म्हणूनच काल अंकुरला हात हलवीत परत जावं लागलं, म्हणजे आजोबांच्या बोलण्यांत तथ्य दिसतंय् म्हणायचं. अतुल असा विचार करतोय् तोंच त्याच्या कानांवर शीळ आली. आजोबा आले कीं काय ? त्यानें बाहेर बघितलें, तो दारापुढच्या नारळाच्या झाडाजवळ आजोबा उभे.

आजूबाजूची चाहूल घेत अतुल आजोबांजवळ आला अन् म्हणाला, " चला. "

' जावं कीं न जावं ' असा त्याच्या मनांत विचार येऊन गेला. पण ' काय व्हायचं असेल तें होऊं दे, ' असा निर्धार करून तो आजोबांबरोबर जायला निघालाच.

आजोबांनीं म्हटलें, " जाण्यापूर्वीं माझ्या घरीं जाऊं. तिथं थोडंसं काम आहे. "

" अरे वा ! तुम्हांला चांगलं शुद्ध बोलतां येतं कीं ! मग त्या दिवशीं खेडवळ भाषा कां वापरीत होतांत ? " अतुलनें विचारलें.

" मी खरोखरच खेडवळ आहें असं तुला वाटावं म्हणून ! " आजोबांनीं योग्य तेंच उत्तर दिलें.

बाजूच्या गल्लींतल्या आजोबांच्या खोलींत गेल्यावर आजोबा त्याला म्हणाले, " आज तूं माझ्याबरोबर अंकुर-कडं येतो आहेस तेव्हां तुला थोडं वेषान्तर करावं लागेल. "

पंधरावीस मिनिटांनीं अतुल आजोबांबरोबर बाहेर पडला तेव्हां त्यांच्याबरोबरचाच तो एखादा खेडवळ मुलगा आहे कीं काय असें पाहणाऱ्याला वाटेल इतकें त्याचें वेषांतर बेमालूम जमलें होतें.

आजोबांनीं त्याला अंकुर नर्सरीपाशीं नेलें तें वेगळ्याच मार्गानें. तिथें गेल्यावर पहारा करणाऱ्या एका जाडगेल्याशा माणसानें त्यांना नमस्कार करून म्हटलें, " आज इकडं कुणीकडं ? "

" आलों असाच, " असें म्हणून आजोबांनीं लगेच विचारलें, " अंकुर कुठं आहे ?"

" अर्थात् प्रयोगशाळेंत " पहारेकऱ्यानें उत्तर दिलें.

त्या जाडचा माणसानें किल्ली लावून त्यांना दार उघडून दिलें. एका वेगळ्याच मार्गानें आजोबांनीं अतुलला एका खोलीपाशीं नेलें. तिथल्या चार पायऱ्या चढून ते दोघे वर आले. तिथें चिचोळा रस्ता होता. जरी तिथें काळोख होता तरी अतुलच्या लक्षांत आलें कीं या चिचोळ्या रस्त्यावरून

पुढें जाऊन डाव्या बाजूला वळलें. म्हणजे जवळच अंकुरची प्रयोगशाळा असावी. कारण तिथून हिरवा प्रकाश येतांना दिसत होता.

अतुल व आजोबा तिथें दबा धरून बसले. जरा वेळानें आंतलें संभाषण ऐकूं यायला लागलें.

"हें बघ चंद्रशेखर," रागानें अंकुर म्हणत होता, "मी काल रात्रीं तुझ्या प्रयोगशाळेंत जाऊन आलों. तुझ्या संशोधनाची माहिती देणारे कागदपत्र मिळाले नाहींत मला तिथं."

"तिथं कागदपत्रंच नाहींत तर मिळणार कुठून ?" दादांचें बोलणें त्यांच्या कानांवर आलें.

रागावून अंकुर ओरडला, "मग ठेवलेयस तरी कुठं ते ?"

"माझं संशोधन पुरं व्हायचंय अजून," दादांनीं शांतपणें उत्तर दिलें,

"साफ खोटं," अंकुर म्हणाला, "तुझ्या त्या सुहृद्-वृंदाच्या वाढदिवसाच्या आधींपासूनच तुझं संशोधन चाललं होतं ना ?"

'चाललं असलं. पण म्हणून तें पूर्ण झालं पाहिजे, असं थोडंच आहे ?" दादांनीं उलट विचारलें.

"अजूनहि ताळ्यावर येत नाहींस तूं चंद्रशेखर," अंकुर वैतागून म्हणाला, "पण लवकरच तुला माझ्या सगळ्या अटी मान्य कराव्या लागतील."

"कसल्या अटी ?" दादांनीं हंसून विचारलें.

"अजूनहि तोच दिमाख !" अंकुर म्हणाला, "काल ज्या अटी ऐकत नाहीं म्हणालास त्या आज ऐक. माणसाचा स्वभाव बदलतां येईल असं म्हणतोस तूं ?"

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.



“ हो म्हणतो, ” दादांनीं विचारलें, “ मग ?”

“ माणसाच्या ठिकाणच्या वाईट भावना काढून त्यांच्या-ऐवजीं त्याच्या ठिकाणीं चांगल्या भावना निर्माण करणं सहज शक्य आहे, असं वाटतं ना तुला ? ” अंकुरनें विचारले.

“ अलबत् ! ” दादा म्हणाले.

“ मग हाच प्रयोग उलटा करायचा माणसाच्या ठिकाणच्या चांगल्या भावना नष्ट करायच्या अन् त्यांऐवजीं वाईट भावनांचं प्रमाण वाढवायचं. हें काम करतांना तुझं काम कमी व्हावं म्हणून मी एक युक्ति काढली आहे. कोणती म्हणून नाहीं विचारलंस ? ” अंकुर म्हणाला.

“ कोणती ? ” दादांनीं विचारलें.

“ तूं सूड, मत्सर, राग असल्या वाईट भावना निर्माण करणारं रसायन तयार करायचंस. मी तुला काल ते नुकतेच तयार केलेले शंभर यांत्रिक मानव दाखवलेच आहेत. त्यांच्या हृदयांत आपण तें रसायन घालूं. ”

“ पण यांत तुझा हेतु काय आहे तें कळत नाहीं मला, ” दादांनीं स्पष्टपणें सांगितलें.

“ नाहींच कळायचं ” अंकुर म्हणाला, “ अरे बाबा, तिथं पाहिजे जातीचं ! ” क्षणभर थांबून अंकुर पुन्हां म्हणाला, “ मला या शंभर यांत्रिक मानवांची सेना तयार करायची आहे. त्यांना मी अनेक क्रूर कामं शिकवीन. दुष्ट भावना निर्माण करणारं रसायन त्यांच्यांत घातलं कीं ते अधिकच दुष्ट बनतील. त्यांच्या मदतीनं अनेक गोष्टी करूं शकेन मी. दरवडे घालून संपत्तीहि मिळवीन. नको असलेल्या माणसांचे

खून घडवून आणीन. माझ्या मनांत असलेलं कितीतरी दिवसांचं सोनेरी स्वप्न पुरं होईल."

"दुष्टा! शास्त्राचा उपयोग मानवाच्या सुखासाठीं करायचा असतो; त्याला पीडण्यासाठीं नव्हे!" चिडून दादा ओरडले.

"हें बघ चंद्रशेखर, तूं कितीहि चिडलास तरी तुला माझं म्हणणं ऐकावंच लागेल. त्याबद्दल तूं मागशील तेवढी संपत्ति द्यायला तयार आहें मी. कायम प्राप्तीचा अर्धा वांटा मागितलास तरी द्यायला तयार आहें मी. अरे, आपला द्रव्याचा झरा अव्याहत चालू राहणार," अंकुर बोलत होता, "या यांत्रिक मानवांना एकदां एक काम नेमून दिलं कीं माणसापेक्षांहि हे उत्तम काम करतील याची खात्री बाळग. माझाच अनुभव सांगतों. पराग अन् पुष्पराज या जिवंत माणसांपेक्षांहि भरारी माझीं कामं जास्त व्यवस्थित करतो. हो, अन् कुठलीहि गुप्त गोष्ट यांच्याकडून बाहेर फुटायची भीति नाहीं. शिकवलेल्या शब्दांपेक्षां जास्त बोलायचे नाहींत कीं आपणहून कुठं जायचे नाहींत. मग? काय ठरला तुझा विचार?"

"साफ नामंजूर आहे तुझं म्हणणं मला," दादांनीं ठामपणें सांगितलें.

"हें बघ चंद्रशेखर," अंकुर बोलत होता, "वनस्पतींवर मी केलेला प्रयोग यशस्वी झालाय्, हें बघितलंस ना तूं? हें मेंदीचं झाड आहे साधं, पण विशिष्ट रसायनं घालीत राहिल्यामुळं हें बेटं कसं दुष्ट बनलंय् बघ. बघ हं हा

शुभ्र ससा ह्या झाडापुढं मी ठेवतों. आतां काय होतं तें तूंच बघ."

आजोबांना अन् अतुलला उत्सुकता वाटली त्यांनीं डोकावून अंकुरच्या मागच्या खिडकींतून हळूच पाहिलें. त्या झाडाच्या फांद्यांनीं पुढें होऊन सशावर झडप घातली होती अन् त्याच्या रक्तमांसाचा तें फडशा पाडूं लागले होतें ! तें दृश्य बघून त्या दोघांच्या अंगांवर शहारेच आले.

'या झाडांना घातलेलंच रसायन मीं मुलांनाहि पाजून बघितल, पण तीं दुष्ट होण्याऐवजीं आजारी पडलीं. चौघं तर वेडीं झालीं, " मोठ्यानें हंसत अंकुरनें पुन्हां विचारलें, " मग काय करणार म्हणतोस ? "

" कांहींऽहि करणार नाहीं मी ! " दादा पुन्हां निश्चयानें बोलले.

" तूं मदत केलीच पाहिजेस मला, " अंकुर म्हणाला, " त्यासाठींच तुझ्या प्रयोगशाळेला भेट दिली होती मी काल. तुझ्या नव्या संशोधनाचीं कागदपत्रं हातांत आलीं असतीं ना म्हणजे मी तीं ठेवून घेणार होतों माझ्याकडे. अन् मला हवं असलेलं रसायन तूं तयार करून देईपर्यंत देणार नव्हतों परत तुला. कांहीं हरकत नाहीं. तुला माझं म्हणणं ऐकावंच लागेल. नाहींतर—"

" नाहींतर काय ? " दादांनीं विचारले.

अंकुर म्हणाला, " जी या सशाची अवस्था झालीं तीच—"

" तीच काय ? " दादांनीं उत्कंठेनें विचारलें,

" तीच तुझ्या अतुलची होईल ! " अंकुरनें प्रत्येक शब्दावर जोर देत उत्तर केलें.

" चांडाळा ! " असें म्हणत दादा मूर्च्छित होऊन पडले. ते शुद्धीवर आले तेव्हां त्यांच्या कानांवर त्या दिवशींच्या अतुलच्या अन् अंकुरच्या संभाषणांतले शब्द पडत होते. म्हणजे ह्या दुष्टान त्या दिवशींचं भाषण ध्वनिमुद्रित करून ठेवलं कीं काय ? '

" पाहिलंस ना, तुझी भेट करून देतों असं सांगितलं कीं आत्तां धांवत येईल तो, " अंकुर म्हणाला, " जर तुला अतुल जिवंत रहायला हवा असेल तर मला मदत कर. "

दादा काय सांगताहेत तें अतुल उत्सुकतेनें ऐकूं लागला.

" होय अंकुर, तयार आहें मी तुला मदत करायला. माझा अतुल हवाय् मला, " दादांचे शब्द अतुलच्या कानांत शिरले, " पण अंकुर, माझी एक अट आहे. "

" ऐकतोंय् मी ", अंकुर बेफिकिरीनें बोलत होता.

" हें बघ, आजपासून बरोबर पंधरा दिवस म्हणजे ७ नोव्हेंबरपर्यंत ही प्रयोगशाळा तूं माझ्या ताब्यांत द्यायचीस. मी कांहीं नवीं उपकरणं मागवीन, रसायनं आणवीन, प्रयोग करीन अन् ७ नोव्हेंबरला रात्रीं बारा वाजतां तुला हवी असलेली गोष्ट साध्य करून देईन; पण या काळांत तूं माझ्या संशोधनांत जरा देखील ढवळाढवळ केलेली खपायची नाहीं मला. आहे कबूल ? "

" कबूल ! कबूल ! " अत्यानंदानें अंकुर ओरडला.

दादा म्हणाले, " तुझ्या त्या शंभर यांत्रिक मानवांना दे माझ्या ताब्यांत, काय ? "

" तूं म्हणशील तें मान्य आहे आतां मला." असें म्हणत अंकुरनें उठून आनंदानें स्वत:भोंवतीं गिरकी घेतली.

त्या दोघांचें तें बोलणें ऐकून आजोबा अतुलला म्हणाले, " अर् ऽ, हें काय बरं केलं दादांनीं ! आतां भेटलंच पाहिजे आपण त्यांना. "

" बरं आहे चंद्रशेखर, तुझे प्रयोग सुरू कर तूं. पंधरा दिवस प्रयोगशाळा तुझ्या ताब्यांत. या पंधरा दिवसांत माझं वास्तव्य या बंगल्यामागच्या छोटया बंगलींत राहील. मग तर झालं ? " अंकुरनें सांगितलें, " पण हें बघ, जर का तूं इथून पळून जायचा प्रयत्न केलास ना, तर तो मात्र यशस्वी व्हायचा नाहीं हें लक्षांत ठेव. अच्छा, चलतों मी. " असें म्हणत अंकुर प्रयोगशाळेंतून बाहेर पडला अन् छोटया बंगलीच्या रोखानें चालूं लागला.

त्याची पाठ वळल्याबरोबर अतुलनें पुढें होऊन हळूच हांक मारली, " दादा ! "

ती हांक ऐकून दादा चमकले, " अरे तूं इथं कसा ? " त्यांनीं विचारलें.

अतुलनें आजोबांकडे बोट दाखविलें. आजोबांनीं पुढें येऊन म्हटलें, " डॉक्टरसाहेब, आपण शक्य तेवढ्या लवकर येथून बाहेर पडायला हवं. "

" नाहीं मित्रा, येथून बाहेर पडायचं नाहीं मला, " दादा म्हणाले.

" म्हणजे तुम्ही तुमच्या बुद्धीचा उपयोग त्या चोराच्या फायद्यासाठीं करणार ? " चिडून आजोबांनीं विचारलें.

" बघशील तूं. मला वाटतं तूं आज अतुलला घेऊन घरीं परतावंस, " दादांनीं शांतपणें सांगितलें.

" तुम्हांला इथं सोडून ? " आजोबांनीं तीव्र स्वरांत विचारलें.

" तुला सांगितलेलं काम कर तूं, " दादा तुटकपणानें बोलले.

* * *

## ७

# आव्हान स्वीकारलें

अखेर दादांच्या आज्ञेप्रमाणें आजोबा व अतुल मागें वळले. पण अतुलचीं पावलें पुढें पडण्याऐवजीं तिथेंच घुटमळूं लागलीं. अखेर त्यानें मन शांत केलें अन् आजोबांबरोबर तोहि बाहेर पडला, पण अर्थात् कांहींशा अनिच्छेनेंच. 'अंकुरला मदत करायचं दादांनीं कसं कबूल केलं ? आपला जीव वांचवण्यासाठीं कीं दुसरा कांहीं हेतु आहे यामध्यें ? कांहीं कळत नाहीं !' अतुलचें मन पुटपुटत होतें.

खरें म्हणजे अतुलला कांहींतरी धाडस करायचें होतें, साहस करायचें होतें. दादांना अंकुरच्या तावडींतून सोडवायचें होतें. पण दादा आपले म्हणत होते, 'घरीं जा' म्हणून. अस्वस्थ मनानें अतुल घरीं परत आला. त्यानंतरचे चौदा दिवस त्याच्या मनाला क्षणभर सुद्धां स्वस्थता लाभली नाहीं.

शेवटीं तो पंधरावा दिवस–तो ७ नोव्हेंबरचा दिवस उजाडला. आज रात्रीं बारा वाजतां दादांना अंकुरनें दिलेली मुदत संपणार होती. अंकुरला हवी असलेली गोष्ट दादा त्याला मिळवून देणार होते–अतुलचा जीव वांचवण्यासाठीं ! एका थोर शास्त्रज्ञाला अखेर एका दुष्टापुढें नमावें लागणार होतें, त्यानंतर दादांचा बंदिवास संपणार होता. अतुलचे

दादा परत घरीं येणार होते. त्या क्षणासाठीं त्याचा जीव आसुसला होता.

मनाच्या त्या अधीर अवस्थेंतच अतुल शाळेंतून घरीं येत असतांना वाटेंतच त्याला आजोबा भेटले. अतुलच्या भेटी-मुळें झालेला आनंद त्यांच्या डोळ्यांतून ओसंडत होता, " लक्षांत आहे ना ? " त्यांनीं अतुलला विचारलें.

" आहे तर ! " अतुल म्हणाला, " आज रात्रीं भेटूं आपण. "

" अकरा वाजतां भेटतों तुला, " असें म्हणून आजोबांनीं पुढचा रस्ता चालायला सुरुवात केली.

रात्रीं अकराला आजोबांची शीळ ऐकूं आली तसा अतुल हळूच घराबाहेर पडला. त्या दिवशींच्याच वाटेनें ते दोघे अंकुरच्या प्रयोगशाळेजवळ आले तेव्हां पावणेबारा झाले होते.

" आतां फक्त पंधरा मिनिटंच राहिलीं, " आजोबांच्या कानांत अतुल कुजबुजला.

बाराचे ठोके पडले. श्वास रोखून ते दोघे आंतल्या हाल-चालीची चाहूल घेऊं लागले.

" नमस्ते चंद्रशेखर ! हं, काय म्हणतो आहेस ?" प्रयोग-शाळेंत येत अंकुरनें विचारलें.

" तयार आहें मी ", दादा म्हणाले, " तुझ्या म्हणण्या-प्रमाणं प्रथम तुझ्या पराग-पुष्पराजवर अन् यांत्रिक मानवां-वर केलेले प्रयोग दाखवतों तुला, " असें म्हणत ते शेजारच्या प्रशस्त दालनामध्यें शिरले. त्यांच्या मागोमाग अंकुरहि त्या

दालनांत शिरला. खिडकीशीं उभे राहून अतुल व आजोबा आंतलें दृश्य बघत होते.

दादांनीं आणि अंकुरनें आंत प्रवेश केल्याबरोबर परागनें म्हटलें, " नमस्ते डॉक्टर चंद्रशेखर बुद्धिसागर ! "

" नमस्ते अंकुर ! " पुष्पराज म्हणाला.

मग पहिला यांत्रिक मानव म्हणाला, " माणसानं नेहमीं प्रामाणिकपणाचाच स्वीकार केला पाहिजे जगांत. "

" या जगांत माणसाला पीडण्यापेक्षां त्याचीं आंसवं पुसणंच जास्त मोलाचं आहे अंकुर," दुसऱ्या यांत्रिक मानवानें त्याला दुजोरा दिला.

तिसरा यांत्रिक मानव म्हणाला, " शास्त्राचा उपयोग मारण्यासाठीं करायचा नसून माणसाला तारण्यासाठीं करायचा असतो, अंकुर. "

" हें काय, चालवलं आहेस तरी काय तूं चंद्रशेखर ?" रागानें पाय आपटीत अंकुरनें दादांना विचारलें,

" थांब, " दादा म्हणाले, " असा चिडूं नकोस. तूं जी गोष्ट सुचवली होतीस त्याबद्दल माझं काय मत आहे तें ऐकवत होतों तुला. बरं, आतां पुढच्या खोलींत चल.'

ते दोघे पुढच्या खोलींत शिरल्यावर एका यंत्रापुढें दादांनीं अंकुरला उभें केलें. बटण दाबून यंत्र सुरू केल्याबरोबर त्यांतून नारिंगी रंगाचे किरण बाहेर पडूं लागले. क्षणभर त्या प्रकाशानें खोली उजळून निघाली अन् काय आश्चर्य ! दोन मिनिटांत अंकुर गाऊं लागला.

**" जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत ।**
**सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत ॥ "**

दादांनी यंत्र बंद केलें अन् परत चालू केलें. किरमिजी रंगाचे किरण बाहेर येऊं लागले. अंकुर म्हणूं लागला,

" म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें ।
तेणें आपण सुखी व्हावें ॥ "

दादांनीं यंत्र बंद करून परत चालू केलें. हिरव्या रंगाच्या किरणांनीं अंकुर न्हाऊन निघाला. पद्मासन घालून त्यानें हात जोडले. अंकुर डोळे मिटून गाऊं लागला.

" सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥"

एखाद्या प्रवचनकारासारखा तो श्लोकाचा मराठी अर्थ सांगूं लागला, " येथें सगळे सुखी असोत. सगळे निरोगी असोत कुणालाहि दुःख प्राप्त न होवो. सर्वांचें कल्याण होवो. "

दहा-पंधरा मिनिटांनीं अंकुर भानावर आला आणि एकदम बोलूं लागला. "चंद्रशेखर मी हरलों, तूं जिंकलास! तुझ्या प्रयोगानं मी बदललों आहें, अंतर्बाह्य बदललों आहें," तो भारावून पुढे सांगूं लागला, " मला अधोगतीच्या मार्गापासून तूं दूर केलंस. तुझा अतिशय ऋणी आहें मी. "

तें दृश्य बघून अतुलचा ऊर अभिमानानें भरून आला. अंकुरच्या दुष्टपणावर त्याच्या दादांनीं जय मिळविला होता. शास्त्रीय शोधांच्या ग्रंथांतलें सोनेरी पान लिहिलें जात होतें.

" माझी ही प्रयोगशाळा, हें अंकुर नर्सरीचं आवार सगळं सगळं मी तुला बक्षीस देतों आहें. आत्तांपर्यंतच्या केलेल्या चुकांचं परिमार्जन व्हावं असं वाटतंय् मला. या क्षणीं इथं डांबलेल्या सगळ्यांना सोडून देतों मी चंद्रशेखर,

माझ्यावर एकच कृपा कर, तुझा मदतनीस म्हणून यापुढं मला काम करूं दे, " अंकुर मनापासून बोलत होता.

" दादांचा असा बेत होता तर ! " आजोबा पुटपुटले, " अन् त्या दिवशीं उगीच चिडलों मीं त्यांच्यावर."

आजोबांकडे बघतां बघतां अतुलच्या लक्षांत आलें कीं, अंकुर म्हणजे दादांच्यावर जळणारा संशोधक अंगार अग्निहोत्री आहे; अन् आजोबा म्हणजे तो पोरगेलासा शास्त्रज्ञ. वेषान्तर करून तो आजोबा बनलेला आहे.

विचारांच्या भरांत तो पुढें सरकला अन् त्यानें दादांना घट्ट मिठी मारली. " आतां माझ्यापासून कधींहि दूर जाऊं नका, " तो म्हणाला.

त्याला एकदम आठवण आली ती छोटूची. 'कुठं आहे छोटू ?' मनांत विचार आला मग अतुलच्या अन् त्याच क्षणीं त्याला जाणवलें कीं अंकुरनें मुक्त केलेला छोटू आपल्याशीं हस्तांदोलन करीत आहे. मोठ्या खुशींतच ते सगळे तेथून बाहेर पडले.

सगळी मंडळी अतुलच्या घरीं आली. 'मुलाची अचानक भेट, आईच्या डोळ्यांतल्या आनंदाश्रूंनीं त्यांचें केलेलें स्वागत. दादा हें सारें पाहून मोठ्या खुशींत होते. आतां त्यांचें सगळें लक्ष लागून राहिलें होतें तें पुढच्या महिन्यांत होणाऱ्या विज्ञान परिषदेकडे.

* * *

७ee२० ... क्रमांक ... नोंद दि. ...

८

# प्रयोग यशस्वी झाला

पुढल्याच महिन्यांत होणाऱ्या विज्ञान परिषदेच्या जाहिराती फडकूं लागल्या. यंदाच्या परिषदेंत डॉक्टर चंद्रशेखर बुद्धिसागर आपला आश्चर्यकारक शोध मांडणार आहेत अशी बातमी सगळ्या वृत्तपत्रांतून झळकली.

मग तो सोनेरी दिवस उगवला. परिषदेचें सभागृह माणसांनीं फुललें होतें. वडेबडे शास्त्रज्ञ, मानसतज्ज्ञ, डॉक्टर अगदीं उत्सुकतेनें डॉक्टर चंद्रशेखरांच्या आगमनाची वाट बघत होते. इतक्यांत निवेदकानें सुरुवात केली, " सुप्रसिद्ध मानसतज्ज्ञ डॉक्टर चंद्रशेखर बुद्धिसागर आतां आपला नवा शोध आपल्यापुढं ठेवतील. "

दादा बोलायला उठल्यावर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. " मित्रहो ! " दादा बोलूं लागले, " स्वभावाला औषध नाहीं अशी आपल्यांत म्हण आहे. ही म्हण आपल्या पूर्वजांनीं जी रचली ती त्यांच्या अनुभवावरून. माझा या बाबतींतला अनुभव वेगळा आहे. अन् म्हणूनच मी म्हणतों स्वभावाला औषध आहे." दादांच्या या वाक्यावर श्रोत्यांनीं टाळ्यांचा गजर केला.

मित्रहो ! माणसाच्या स्वभावांत संपूर्णपणानें बदल

करणें सहज शक्य आहे ही गोष्ट आपणापुढें मी सप्रयोग सिद्ध करून दाखवणार आहें."

दादांचें हें वाक्य संपल्याबरोबर त्यांनीं खूण केली. सभागृहाच्या खिडक्यांवरचे काळे पडदे ओढले गेले. व्यासपीठावरचा दिवा सोडून बाकी सगळे दिवे मालवले गेले.

"मित्रहो! आत्तांपर्यंत माणसाच्या शरीराच्या आंतल्या भागाचें संपूर्ण चित्र दिसावें, विकृति लक्षांत याव्यात म्हणून आपण क्ष-किरणांचा उपयोग करीत होतों. यापुढें माणसाच्या मनांतले विचार, भावना यांचें चित्र बघणें आपल्याला शक्य होणार आहे. आतां मीं शोधलेल्या य-किरणांचा उपयोग करून प्रयोग करतों. बघा काय दिसतें."

दादांच्या या वाक्याबरोबर व्यासपीठावरचा दिवाहि मालवला गेला. सभागृहांत संपूर्ण काळोख झाला. कळ दाबून दादांनीं यंत्र सुरू केलें. यंत्रासमोरच्या माणसाच्या हृदयाचें उलटें चित्र समोर दिसायला लागलें. जरा वेळानें बाजूच्या रिकाम्या जागेवर एक वाक्य उमटलें.

"अत्यंत मत्सरी, अप्रामाणिक, सूड घेण्यासाठीं खूनहि करील. मुख्य म्हणजे उलटें काळीज सुलटें केलें पाहिजे."

सर्व सभागृहानें तो मजकूर मोठ्यानें वाचला.

व्यासपीठावरचा दिवा लागला. यंत्राच्या बाजूला लावलेलें कार्ड उचलून दादांनीं लोकांना दाखविलें. एका स्वयंचलित झरणीनें त्या माणसाच्या स्वभावाचा आलेख काढलेला होता.

"ही झाली प्राथमिक चांचणी. ज्या माणसाची आपण ही चांचणी केली त्याचं नांव आहे दगडू. हा अट्टल दरोडेखोर आहे. या दगडूचें हृदयपरिवर्तन करतां येईल, या गोष्टीवर

तुमचा विश्वास बसतो का ? " दादांनीं उपस्थितांना विचारलें.

" बिलकूल नाहीं ! " सर्वांनीं उत्स्फूर्तपणानें उत्तर दिलें.

" मग बघाच तर ! " दादा आत्मविश्वासानें म्हणाले.

मद्याचें यंत्र बाजूला सारलें गेलें. दुसरें यंत्र पुढें आणलें गेलें.

" आतां मी याच्यावर नारिंगी रंगाचे हे प किरण सोडतों, " दादा बोलूं लागले, " या किरणांचं कार्य असं आहे कीं, माणसाच्या ठिकाणीं असलेला संकुचितपणा ते नष्ट करतात अन् त्याच्या मनांत विश्वबंधुत्वाची भावना



निर्माण करतात. बघा आतां या किरणांचा प्रभाव, " असें म्हणून दादांनीं यंत्र चालू केलें. क्षणभरांत दगडू गाऊं लागला.

" हें विश्वचि माझें घर ! "

" आतां ही दुसरी गोष्ट बघा, " असें म्हणून दादांनीं दुसरें एक बटण दाबलें. यंत्रांतून किरमिजी किरण बाहेर पडूं लागले. ते किरण अंगावर पडले अन्

" वैष्णव जन तो तेणे कहिये
जो पीड पराई जाणे रे ।। "

असें गाणें दगडू म्हणूं लागला.

" हे किरमिजी किरण म्हणजे र किरण. हे सेवाभाव निर्माण करतात. आतां हें बघा " असें म्हणून दादांनीं एक नवीनच कळ दाबली. यंत्रांतून निराळेच किरण बाहेर पडूं लागले. दादा म्हणाले, " हे गर्द जांभळे किरण. त्यांना व किरण नांव दिलें आहे मीं. हे अंगावर पडल्यावर कट्टर नास्तिक आस्तिक बनतो."

दादा सांगत होते. लोक देहभान विसरून ऐकत व पहात होते. " हे लाल रंगाचे स किरण त्यागाची भावना निर्माण करणारे. हे किरण काय चमत्कार करतात सांगूं ? अहो, हे किरण अंगावर पडल्याबरोबर अगदीं कवडीचुंबक माणूसहि दानशूर कर्णाला लाजवील असें दान द्यायला तयार होतो."

" पण हा बदल किती काळपर्यंत टिकूं शकेल ? " कोणींतरी शंका विचारली.

" तो माणूस मरेपर्यंत. " दादांनीं उत्तर दिलें.

" खरं ? " दुसऱ्यानें विचारलें.

" अगदीं खरं. कोणकोणत्या रंगाचे किरण कोणकोणत्या भावना निर्माण करतात याबद्दलचें विस्तृत विवेचन मी माझ्या या नव्या ग्रंथांत केलें आहे. जिज्ञासूंनीं तें अवश्य बघावें म्हणजे इतर असंख्य भावनांविषयींच्या प्रयोगांची त्यांना माहिती मिळेल. "

" आतां शेवटचा प्रयोग बघा, " असें म्हणत दादांनीं पुन्हा यंत्र चालू केलें. हिरवेगार किरण यंत्रांतून बाहेर पडूं लागले. दगडूच्या चेहऱ्यावर राकटपणाचा, दुष्टपणाचा मागमूसहि राहिला नाहीं. सायेब, येवडे दिस सोन्यावाणी आयुक्षाचा सत्तेनास जाला बगा. आता ह्ये बंद सारं, " दगडू म्हणाला. दादांनीं त्याला परत पहिल्या यंत्रासमोर उभें केलें. त्याचें उलटें काळीज सुलटें झालें होतें.

" शाबास चंद्रशेखर ! " " कमाल केलीत डॉक्टर चंद्रशेखर ! " साऱ्या सभागृहांतून आवाज येऊं लागले. अनेकांनीं स्तुतिसुमनें उधळलीं दादांवर.

किंचित् थांबून दादा पुढें बोलूं लागले, " माझ्या या नव्या शोधाचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठीं व्हावा अशी माझी इच्छा आहे. त्याबद्दलची एक नवी कल्पना मला आपल्यापुढें मांडावीशी वाटते. मला असें वाटतें कीं, आज मुंबईसारख्या किंवा दिल्लीसारख्या ठिकाणीं एखाद्या मोठ्या रुग्णालयांत स्वभावपरिवर्तन केंद्र स्थापन करायची सरकारनें मला परवानगी द्यावी. मी सरकारला विनंती करणार आहें, सांगणार आहें कीं अशा प्रकारचं केंद्र जर मला स्थापन करायला मिळालें तर मी तिथें आजन्म विनामूल्य काम करायला तयार आहें. "

पुन्हां एकदां टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. अनेकांनीं दादांशीं हस्तांदोलन केलें. अभिनंदनाच्या शब्दांचा त्यांच्यावर जणूं पाऊस पडला.

त्यानंतरच्या आठ दिवसांत देशांतून आणि परदेशांतूनहि अनेक अभिनंदनाच्या तारा दादांना आल्या. जिकडे तिकडे

दादांच्या नव्या संशोधनाशिवाय लोकांना चर्चेला दुसरा विषय नव्हता.

पुढल्या महिन्यांत मुंबईच्या एका प्रशस्त रुग्णालयाला जोडून दादांनीं आपलें स्वभावपरिवर्तन केंद्र सुरू केलें. उपचारांना सुरुवात झाली. शाळा चुकवून पळणाऱ्या, खोड्या करणाऱ्या मुलांच्या मनांत दादांनीं अभ्यासाबद्दल गोडी निर्माण केली. अप्रामाणिक व्यापाऱ्यांना नेकीनें वागायला शिकविलें. वाऱ्याशींहि भांडणाऱ्या भांडकुदळांना लव्हाळ्याहून नम्र बनविलें. दुष्टांचें दुष्टत्व घालविलें. तुरुंगांतून सुटून आलेल्या अनेक अट्टल दरोडेखोरांना दादांनीं सज्जन बनविलें; त्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून दिला. अंतरंगांत बदल झालेल्या अशा अनेकांनीं दादांना दुवे दिले. या सगळ्यावर कळस चढला तो प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीं. त्या दिवशीं राष्ट्रपतींनीं दादांना 'पद्मश्री' ही मानाची पदवी बहाल केली

त्यानंतर 'सुहृद-वृंद'च्या वतीनें दादांचा झालेला सत्कार फार गाजला. त्या दिवशीं नाटककार चतुरांनीं म्हटलें, "चंद्रशेखर माझे त्या दिवशींचे शब्द परत घेतों. मी म्हटलं होतं कीं, माणसाचा स्वभाव बदलणं शक्य नाहीं."

" आधीं होती दासी। पट्टराणी केलें तिसी
तिचें हिंडणें राहीना। मूळ स्वभाव जाईना ॥

असंहि तुम्ही म्हटलं होतंत," त्या पोरगेल्याशा शास्त्रज्ञानें आठवण करून दिली.

"पण आतां असं म्हणायला हवं कीं,

आधीं होता खल । त्यासि बनविला सुशील ।
खलत्व त्याचें न राहिल । मूळ स्वभाव जाईल ॥ ”

अतुल म्हणाला.

“ अरे वा ! बराच मोठा कवि झालाय् म्हणायचा हा पठ्ठ्या ! ” असें म्हणत नाटककार चतुरांनीं त्याची पाठ थोपटली.



त्यापाठोपाठ अतुलच्या कानांवर त्याच्या आईचे शब्द आले, “ किती वेळ झोपून राहिला आहेस बाबा ! ” अन् त्याच क्षणीं त्यानें डोळे उघडले. सकाळचीं कोवळीं उन्हें अंगावर पडलीं होतीं. अंगावरची चादर दूर करीत तो पुटपुटला, “ म्हणजे हे सगळं स्वप्नच होतं कीं काय ?

* * *

म. प्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र.... ११५१८ नों. दि ... ...... ..
वि
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम
क्रमांक 13169
IRBK-0111718